दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८५ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, ३ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-




## मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती

**असे राबवले जाणार अभियान :** जास्तीत जास्त नागरिकांनी २० मे रोजी मतदान करावे, यासाठी ठिकठिकाणी जागजागृती फलक लावण्यात येणार आहेत. याशिवाय वृत्तपत्रांतून जाहिराती, नभोवाणी संदेश, भित्तिपत्रके, तसेच समाज माध्यमांद्वारे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. जनजागृती तसेच चित्रपटगृहे, नाट्यगृहांमध्येही जनजागृतीवर भर देण्यात येणार कार्यक्रम तसेच बसस्थानक, रेल्वे स्थानकांवर प्रवाशांना मतदानाची आठवण करून देण्यासाठी सातत्याने उद्घोषणा देण्यात येणार आहेत.

**■मुंबई, विशाल कारंडे,**

लोकसभा निवडणुकीसाठी शहर आणि उपनगर जिल्ह्यांतील एकूण सहा मतदारसंघांत अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी पालिकेकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. यात सहा मतदारसंघांतील गृहनिर्माण संस्था, मोठ्या इमारती, व्यापारी संकुले, मंडई, चित्रपटगृहे, बाजारपेठ, नाट्यगृहे, मॉल, शाळा, महाविद्यालयांत जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले. पालिका मुख्यालयात सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत निवडणूक तयारीचा आढावा घेण्यात आला. सहआयुक्त (निवडणूक) विजय बालमवार यांनी निवडणूक कामकाजाचे नियोजन आणि जनजागृतीसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती या वेळी सादर केली. पुढील महिन्यात २० मे रोजी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांतील मिळून सहा लोकसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. त्या दृष्टीने पालिका, मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडून समन्वयाने कामकाज सुरू आहे. गत वेळी म्हणजेच सन २०१९ मधील लोकसभा निवडणुकीच्या वेळी झालेल्या मतदानापेक्षा यंदा मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी काय उपाययोजना करावयात, यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. गेल्या वेळी महानगरपालिका प्रभागनिहाय मतदारसंघात मतदानाची टक्केवारी ६० टक्क्यांपेक्षा कमी होती, त्या प्रभागांतील टक्केवारी कशी वाढेल, यासाठी प्रशासनाचा आराखडा तयार करा, असे निर्देश यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. जोशी यांनी दिले.

**बचत गटांचाही मोहिमेत सहभाग :** अंगणवाडी सेविका, आरोग्यसेविका, बचत गटांमधील सदस्य, शिक्षकांनाही या जनजागृती मोहिमेत सहभागी करून घेण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यास सुरुवात केल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### ‘आप’च्या संजय सिंह यांना जामीन, ईडीचा विरोध नाही

## आता केजरीवालांचं काय होणार?

**■नवी दिल्ली, प्रगती शर्मा,**

दिल्लीतील कथित दारू घोटाळ्याप्रकरणी 'आप'चे खासदार संजय सिंह यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. गेल्या सहा महिन्यापासून तुरुंगात असलेल्या संजय सिंह यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला. महत्त्वाचं म्हणजे ईडीने या प्रकरणात संजय सिंह यांना जामीन देण्यास काही अडचण नसल्याचं सांगितलं होतं.

पण याचा परिणाम याच संबंधित इतर प्रकरणांवर होणार नाही, याचा संदर्भ इतर ठिकाणी वापरता येणार नाही अशा सूचना न्यायालयाने दिल्या आहेत. त्यामुळे कथित दारू घोटाळा प्रकरणी तुरुंगात असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनादेखील दिलासा मिळणार का हे



पाहावं लागेल.

दिल्लीतील कथित दारू घोटाळा प्रकरणात आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांना जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, संजय सिंह यांनी या प्रकरणाबाबत मीडियामध्ये कोणतेही वक्तव्य करू नये. जामिनाच्या अटी कनिष्ठ न्यायालयाने ठरवाव्यात अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. संजय सिंह यांना दिलेली सूट इतर सर्व प्रकरणांमध्ये उदाहरण म्हणून लागू करता येणार नाही असेही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

## राज्यात १२ लाख शालेय विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक अवैध

**■ठाणे, रोहित जैसवाल,**

राज्यातील सरकारी शाळांमधील एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्य सरकारी शाळांमधील जवळपास १२ लाख विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक अवैध आहेत. ३० मार्चपर्यंत झालेल्या आधार कार्ड वैधता पडताळणी प्रक्रियेतून ही बाब समोर आली आहे. राज्य सरकारी शाळांमधील दोन कोटीहून अधिक विद्यार्थ्यांची आधार कार्ड वैधता प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या पैकी जवळपास १२ लाख विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक हे अवैध असल्याचे आढळून आले आहेत. हे १२ लाख विद्यार्थी राज्य सरकारकडून देण्यात येणाऱ्या गणवेशापासून वंचित असल्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांचा ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक आधार कार्ड क्रमांक अवैध आढळून आले आहे. याचा



परिणाम जिल्ह्यातील जवळपास दोन लाख विद्यार्थ्यांवर झाला आहे. राज्यातील कोल्हापूर आणि नगरसह १२ जिल्ह्यांनी पडताळणीची प्रक्रिया वेळेत पूर्ण केली आहे. आधार कार्ड क्रमांक अवैध आढळून आलेल्या विद्यार्थ्यांची सत्यता तपासली जाईल. ही समस्या सोडवली जाईल. ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक अवैध आढळून आले आहेत त्या विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष तपासणी करावी, असे आदेश शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. आधार कार्ड क्रमांक अवैध असल्याने हे लाखो विद्यार्थी गणवेश आणि पोषण आहार योजनेच्या लाभापासून वंचित असण्याची शक्यता आहे. एवढेच नव्हे तर, राज्यातील ३२,०९५ विद्यार्थ्यांची आधार कार्ड वैधता तपासणी अजून बाकी आहे. अधिकाऱ्यांनी या विद्यार्थ्यांची पडताळणी करावी. त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. ९५ टक्के विद्यार्थ्यांचे आधार कार्ड वैध आहेत. फक्त ५ टक्के विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची समस्या आहे. त्यांना वैध आधार कार्ड मिळाल्याची खात्री केली जाईल, असे मांढरे यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे, त्यातील ६० लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची पडताळणी अजून व्हायची आहे. काही आधार क्रमांक हे UIDAI कडून अवैध ठरवले गेले आहे किंवा विद्यार्थ्यांच्या पोर्टलशी डेटा सुसंगत होत नसल्याने त्यांनी तो वैधतेसाठी पाठवलेला नसावा, अशी शक्यताही अधिकायांनी वर्तवली आहे.

## १ एप्रिलपासून वीजदरात २० टक्क्यांनी वाढ

### मुंबईकरांची वीज महागली



**■मुंबई, नितीन देवळेकर :**

दक्षिण मुंबईतील साडेदहा लाख ग्राहकांना वीज देणाऱ्या ‘बेस्ट’ उपक्रमाच्या वीजदरात सोमवारपासून सरासरी २० टक्क्यांची वाढ झाली आहे. ‘बेस्ट’सह टाटा (सरासरी ५५ टक्के), अदानी आणि महावितरण (५-६ टक्के) या कंपन्यांचीही वीज महागली आहे. सर्व वीज वितरण कंपन्यांचे नवे दर १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीसाठी लागू आहेत. वीज वितरण कंपन्यांच्या वीजदरांची निश्चिती पाच-पाच वर्षांनी लागू होते. या दरांचा मध्यकालीन आढावा घेतला जातो. त्यानुसार सध्याची दरनिश्चिती २०२०-२१ ते २०२४-२५साठी झाली. या दरांचा मागील वर्षी मार्च महिन्यात फेरआढावा घेण्यात आला व त्याचवेळी २०२३-२४ आणि २०२४-२५साठीचे दर घोषित झाले होते. त्यानुसार ‘बेस्ट’च्या वीज शुल्क अधिक वहन आकार व अन्य शुल्क मिळून ‘व्हेरिएबल चार्जेस’ या नावे असलेल्या वीजदरांत पहिल्या दोन श्रेणींत मोठी वाढ आहे. ‘बेस्ट’ उपक्रमाची वाढ प्रामुख्याने ० ते १०० व १०१ ते ३०० युनिट वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांच्या दरात आहे. तर, अधिक वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांच्या वीजदरातील वाढ नाममात्र असून, मासिक ५०१ युनिटहून अधिक वीज वापरणाऱ्या ग्राहकांच्या दरात ३३ पैशांची घट झाली आहे. दुसरीकडे मुंबईत सर्वाधिक ३० लाख ग्राहकांना वीज देणाऱ्या अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड या कंपनीच्या दरांमध्ये (वीज शुल्क अधिक वहन आकार व अन्य शुल्क मिळून व्हेरिएबल चार्जेस) अत्यंत माफक वाढ झाली आहे. तर, टाटा कंपनीने मागील वर्षीच्या मध्यकालीन आढाव्याच्या ऑर्डरविरुद्ध आयोगात नव्याने प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार त्यांची सरासरी ५५ टक्के वीज दरवाढ याआधीच निश्चित झाली होती. तीदेखील सोमवारपासून लागू झाली. मुंबईतील दोन उपनगरांसह ठाणे व पुढे संपूर्ण महाराष्ट्रात वीज वितरण करणाऱ्या राज्य सरकारी महावितरण कंपनीच्या दरात वीज शुल्क व वहन आकार धरून सरासरी ५ ते ६ टक्क्यांची वाढ झाली आहे.

**घरगुती श्रेणीतील ग्राहकांसाठी कंपन्यांचे दर**

**बेस्ट (रुपये प्रति युनिट)**

● **श्रेणी आधीचे आता वाढ/घट टक्केवारी**
- ०-१०० ३.६९ ५.०२ १.३३ ३६
- १०१-३०० ७.०४ ८.३० १.२६ १८
- ३०१-५०० १०.६३ १०.८१ ०.१८ १.७०
- ५०१ व पुढे १२.६० १२.२७ -०.३३ -२.६२

(मार्च २०२३च्या मध्यकालीन आढाव्याच्या प्रसिद्धी पत्रकानुसार ग्राहकांना लागू होणारे एकूण शुल्कानुसारचे (वीज शुल्क + वहन आकार व अन्य) दर)

**महावितरण (रुपये प्रति युनिट)**

● **युनिट आधीचे आता वाढ/घट टक्केवारी**
- ०-१०० ५.५८ ५.८८ ०.३० ५.३७
- १०१-३०० १०.८१ ११.४६ ०.६५ ६
- ३०१-५०० १४.७८ १५.७२ ०.९४ ६.३६
- ५०१ व पुढे १६.७४ १७.८१ १.०७ ६.३९

(मार्च २०२३च्या मध्यकालीन आढाव्याच्या प्रसिद्धी पत्रकानुसार)

**अदानी इलेक्ट्रिसिटी (रुपये प्रति युनिट)**

● **युनिट आधीचे आता वाढ/घट टक्केवारी**
- ०-१०० ५.६६ ५.७५ ०.०९ १.६०
- १०१-३०० ७.७६ ८.०० ०.२४ ३.०९
- ३०१-५०० ९.६६ ९.७० ०.०४ ०.४१
- ५०१ व पुढे १०.७६ १०.७५ -०.०१ -०.०९

**टाटा पॉवर (रुपये प्रति युनिट)**

**युनिट आधी आता वाढ टक्केवारी**
- ०-१०० ३.३४ ५.३३ १.९९ ५९
- १०१-३०० ५.८९ ८.५१ २.६२ ४४
- ३०१-५०० ९.३४ १४.७७ ५.४३ ५८
- ५०० व पुढे १०.०४ १५.७१ ५.६७ ५६

## रेल्वे स्थानकाच्या तिकीट खरेदीत बॅटमॅन पथकाच्या कारवाईमुळे वाढ

**■मुंबई, यश सावंत :**

पश्चिम रेल्वेच्या बॅटमॅन पथकाने गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी विनातिकीट प्रवास करणाऱ्या कारवाई अभियान हाती घेतले आहे. या कारवाईमुळे विनातिकीट प्रवास करणारे प्रवासी आता तिकीट घेऊन प्रवास करत असल्याचे चित्र दिसत आहे. बॅटमॅन पथकांच्या तपासणीनंतर काही रेल्वे स्थानकाच्या तिकीट विक्रीत सरासरी आठ टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली असल्याची माहिती पश्चिम रेल्वेने दिली आहे. लोकलमधून रात्री अनेक प्रवासी बिनधास्तपणे विनातिकीट प्रवास करत असल्याच्या तक्रारी रेल्वेला प्राप्त झाल्या होत्या. विशेष म्हणजे, रात्री आठनंतर लोकल स्थानकावर तिकीट तपासणी जवळपास बंद असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी फुकट्या प्रवाशांची संख्या वाढते.



त्यामुळे रात्री लोकलमध्ये फुकट्या प्रवाशांना आळा घालण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाने बॅटमॅन (बी अवेअर टीटीई मॅनिंग ॲट नाइट) या पथकाची स्थापना केली असून हे पथक रात्रीच्या वेळेस तिकीट तपासणी करून फुकट्या प्रवाशांवर कारवाई करत आहे.

बॅटमॅन पथकाने दादर, बोरिवली, विरार, कांदिवली आणि भाईंदर स्थानकांत तिकीट तपासणी केली आहे. या तिकीट तपासणी मोहिमेतून स्थानकांतून तिकीट विक्री वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. दादर स्थानकात ४-५ मार्च रात्री बॅटमॅन पथकाची नियुक्ती करून तपासणी करण्यात आली होती. बॅटमॅन पथकांच्या तपासणीआधी २,५७९ तिकीटांची विक्री झाली होती. तपासणीनंतर ही विक्री ३,७६४ पर्यंत पोहोचली आहे. दादरप्रमाणे बोरिवलीमध्ये ११.८३ टक्के, विरारमध्ये ६२.१६ टक्के, कांदिवलीमध्ये १७.४४ टक्के आणि भाईंदरमध्ये १०.५५ टक्के तिकीट विक्री वाढली आहे.

## पोलीस आयुक्तांनी ३९ आरोपींवर लावला मोक्का

### पिंपरीत ‘चौबे पॅटर्न’, आतापर्यंत एकूण ३९६ आरोपींवर कारवाई

**■पिंपरी, दिगंबर जाधव,**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील आठ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण ३९ आरोपींवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. शहरातील गुन्हेगारी समूळ नष्ट करण्याच्या हेतूने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे हे ठोस पाऊल उचलत आहेत. सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये ‘चौबे पॅटर्न’ बघायला मिळत असून गुन्हेगारांना हद्दपार करण्याचं काम सध्या पोलीस आयुक्त करताना दिसत आहेत.

आगामी लोकसभा निवडणूका



भयमुक्त आणि निःपक्षपाती पार पडाव्यात यासाठी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी २०२४ मध्ये आजतागायत आठ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील एकूण ४० आरोपींवर मोक्कांतर्गत कारवाई केली आहे. निवडणुका आल्या की गुन्हेगारी टोळ्या सक्रिय होतात.

यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असतं. अनेक गुंड हे स्थानिक नेत्यांनी पोसल्याचं देखील बघायला मिळतं. यामुळे अशा गुंडांवर पिंपरी- चिंचवड पोलिसांनी वचक राहावा यासाठी गेल्या तीन महिन्यांत ३९ आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे. विनय कुमार चौबे यांनी पोलीस आयुक्तालयाचा पदभार स्वीकारल्यापासून मोक्का पॅटर्न राबवला जात आहे. विनयकुमार चौबे यांनी आत्तापर्यंत ३९६ आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई केली.

## बस थांब्यांजवळ थांबणाऱ्या दीड हजार रिक्षांवर कारवाई



**■पुणे, अभिजीत येरुल्लू**

शहर आणि पिंपरी चिंचवडमधील पीएमपीची बस स्थानके किंवा थांब्याजवळ थांबणाऱ्या १ हजार ६२० रिक्षांवर पीएमपी आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) पथकाने गेल्या तीन महिन्यांत खटले भरून कारवाई केली आहे. पीएमपीची बसस्थानके किंवा बसथांब्यांपासून ५० मीटर अंतरावर रिक्षाचालकांना रिक्षा थांबवता येत नाही, असा नियम आहे.

परंतु रिक्षाचालक त्या नियमाकडे दुर्लक्ष करून सर्रास पीएमपीच्या मुख्य बसस्थानकांच्या परिसरात येवून बसप्रवाशांची वाहतूक करतात. तसेच बसचालकांना अडथळा होईल अशा प्रकारे रिक्षा उभ्या करतात, अशा तक्रारी पीएमपीचे चालक, प्रवासी आणि प्रवासी मंच या संघटनेकडून प्रशानाकडे सातत्याने करण्यात आल्या होत्या. त्याची दखल घेऊन पीएमपी आणि आरटीओ अधिकारी यांची दोन पथके तयार करण्यात आली आहेत. त्यात पीएमपीचे चार कर्मचारी आणि एक आरटीओ अधिकारी यांचा समावेश आहे. त्यांनी गेल्या ३ महिन्यांत पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील पीएमपीएमएलच्या मुख्य बसस्थानकांच्या ५० मीटरच्या परिसरात येवून नियम मोडणाऱ्या एकूण १,६२० रिक्षाचालकांवर कारवाई केली आहे, अशी माहिती पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय कोलते यांनी दिली.

तसेच स्वारगेट बसस्थानकाचे परिसरात वाहतूकीस अडथळा करणाऱ्या रिक्षा, ओला, उबेर, लक्झरी बस आदी वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ नुसार १ जानेवारी ते २५ मार्चअखेर ५३० वाहनांवर कारवाई करून वाहतूकीस अडथळा केल्याबद्दल त्यांच्याकडून एकूण रक्कम ३ लाख ३२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आल्याचे पीएमपीचे वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांनी सांगितले.

## प्रवासी वाहतुकीतून मध्य रेल्वेची ७,३११ कोटींची कमाई



**■मुंबई, विशाल पाटील,**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या टाळेबंदी काळात मध्य रेल्वेवरील प्रवाशांची रोडावलेली संख्या पुन्हा वाढू लागली आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ, नागपूर या विभागातून प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय म्हणजेच आठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. परिणामी, मध्य रेल्वे सर्वाधिक प्रवाशांची वाहतूक करणारी भारतीय रेल्वे ठरली असून प्रवासी वाहतुकीतून मध्य रेल्वेला ७,३११ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे.

मध्य रेल्वेवरून हजारोंच्या संख्येने लोकल फेऱ्या आणि लांब पल्ल्याच्या गाड्या धावतात. या रेल्वेगाड्यांच्या तिकीट दरातून मध्य रेल्वेला करोडो रुपयांचा महसूल मिळाला आहे. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, २०२२-२३ या आर्थिक वर्षात १४६.५ कोटी प्रवाशांनी प्रवास केला. तर, २०२३-२४ या आर्थिक वर्षात १५८.३ कोटी प्रवाशांनी प्रवास केला. प्रवासी संख्येत आठ टक्क्यांची वाढ नोंदवून सर्व विभागीय रेल्वेमध्ये मध्य रेल्वेने प्रथम स्थान पटकावले आहे. याशिवाय, २०२२-२३ या आर्थिक वर्षात मध्य रेल्वेला प्रवासी महसूलापोटी ६,४१४ कोटी रुपये मिळाले असून २०२३-२४ या आर्थिक वर्षात ७,३११ कोटी रुपये मिळाले आहेत. यात १४ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## प्रशासन अलर्ट मोडवर... सार्वजनिक शांतता भंग केल्याने १,५८४ जणांवर कारवाई




**■रायगड, सचिन कदम,**

निवडणुकीदरम्यान रायगड जिल्ह्यात नेहमीच वादविवाद होतात. मागील निवडणुकीत निर्माण झालेला वाद अद्यापही न्यायालयीन प्रक्रियेत आहे. असे असताना आगामी लोकसभा निवडणुका शांततेत पार पडाव्यात, यासाठी जिल्हा पोलिस प्रशासन सतर्क झाले आहे. आचारसंहिता लागू असल्याने, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता भंग केल्याने विविध कलमान्वये १,५८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. वादविवाद किंवा भांडणास प्रोत्साहन करणे, हाणामारीत सहभाग, प्रक्षोपक भाषण करून कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. लोकसभा निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिस ॲक्शन मोडवर असल्याची माहिती पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता १६ मार्च रोजी दुपारी लागताच जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. निवडणूक काळात राजकीय वादविवाद, पूर्व वैमनस्य उफाळून येण्याची शक्यता असल्याने जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांची संयुक्त समिती पिस्तूल, रायफल व इतर अग्निशस्त्रे जमा करून घेण्याची कार्यवाही पूर्ण करीत आहे.परवानाधारकांकडील शस्त्र जमा करून घेण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यात पंचवीस पोलिस ठाणे असून १,६९१ जणांना शस्त्र परवाने दिले आहेत. यापैकी ६९२ शस्त्रे जमा करण्यात आली आहेत. तर गुन्ह्याच्या अनुषंगाने दहा शस्त्रे जमा करण्यात आले आहे. तर १२ जणांचे परवाने रद्द केले आहेत. १२९ परवानाधारकांना सूट देण्यात आली आहे. ८४८ शस्त्रे अद्याप जमा झाली नसल्याची माहिती अप्पर अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली. त्याचप्रमाणे अवैध शस्त्र बाळगून निवडणुकीच्या काळात मतदारांना धमकी देणाऱ्यांवर पोलिसांची नजर आहे. जिल्ह्यात दारूबंदी कारवाईअंतर्गत १५१ गुन्हे दाखल करून ६,९१३ लिटर दारू जप्त केली आहे. त्याची किंमत ४ लाख ३० हजार रुपये इतकी आहे. पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे याबाबत प्रशिक्षण घेण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज आहे. गुन्हा करण्यास उत्तेजन केल्याप्रकरणी रायगड पोलिसांनी १,४४३ जणांवर कारवाई केली आहे. निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज असून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले सध्या पोलिसांच्या रडारवर आहेत. प्रत्येक नागरिकाने प्रत्येकाने आचारसंहितेचे पालन करावे, कायद्याचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

//सुविचार

'जोपर्यंत आपण इतरांना आपल्या समस्या आणि अडचणींचे कारण समजत आहात तोपर्यंत आपण आपल्या समस्या आणि अडचणी मिटवू शकत नाही.' //

# औषध घेताना घ्या काळजी!

औषध घेण्याच्या काही विशिष्ट पद्धती असतात. जर त्या पाळल्या नाही गेल्या तर समस्या आणखी वाढू शकतात.

▮जर तुम्ही नियमित आपल्या फॅमिली डॉक्टरकडे जात असाल आणि एखाद्या नवीन डॉक्टरकडे गेल्यास तुमची मेडिकल हिस्ट्री आणि सध्या घेत असलेल्या औषधांची माहिती त्या डॉक्टरांना अवश्य द्या. कोणत्या औषधानं ॲलर्जी होत असल्यास त्याचीही माहिती डॉक्टरांना द्या.

▮आपल्या मर्जीनं जुन्या प्रिस्क्रिप्शनवर औषधं घेऊ नये. कारण ती औषधं त्यावेळची लक्षणं आणि आजार पाहून दिलेली असतात.

▮एखादं औषध घेतल्यावर पोट खराब होणं, स्किन इन्फेक्शन अथवा सूज आल्यास तत्काळ डॉक्टारांशी संपर्क साधा.

▮औषध रिकाम्यापोटी खायचं आहे की जेवण झाल्यानंतर खायचंय याची माहिती डॉक्टरांना विचारावी.

▮औषधाची एक्सपायरी डेट पाहावी. तारीख बरोबर असेल मात्र औषधाची अवस्था खराब असल्यास, सिल फोडलेलं असल्यास अथवा रंग खराब झालेला असल्यास ते औषध घेऊ नये.



# लाकडी कंगव्याचा वापर देईल केसांना नवसंजीवनी

आजकाल केस गळणे, तुटणे, रुक्ष होणे अशा अनेक तक्रारी ऐकायला येतात. त्यावर उपचार म्हणून विविध प्रकारचे शाम्पू, तेल, कंडिशनर वापरण्याचा सल्ला दिला जातो, मात्र तरीही खूप फायदा होतो असे दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या या केस समस्येचे कारण आपण वापरत असलेला कंगवा तर नाही ना याची खात्री करून घ्यायला हवी. कारण केसांच्या या तक्रारींसाठी तुम्ही वापरात असलेले प्लास्टिक अथवा धातूचे कंगवे कारणीभूत असू शकतात. या समस्येतून सुटका करून घेण्यासाठी लाकडापासून बनवले गेलेले कंगवे खूपच उपयुक्त ठरतात.



भारतात फार पूर्वीपासून लाकडापासून बनवलेली फणी वापरण्याची प्रथा होती. आजही ग्रामीण भागात वृद्ध आजीबाईकडे अशी फणी सापडू शकेल. मात्र काळाच्या ओघात ही प्रथा बंद पडली. आता या फण्या कदाचित जुन्या वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतील. पण बाजारात अनेक कंपन्यांनी विविध झाडांच्या लाकडापासून बनवलेले कंगवे आणले आहेत. हे कंगवे तुमच्या केसांना नवसंजीवनी देणारे ठरू शकतात. याची अनेक कारणे आहेत.

डोक्याची केसाखालची त्वचा लाकडी कंगव्याच्या वापराने दाबली जाते. याचा फायदा डोक्यावरील ॲक्युप्रेशर पॉइंटना होतो आणि त्वचेला मसाज मिळाल्याने तेथील रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसाची मुळे घट्ट बनून केसगळती कमी होते. प्लास्टिक वा धातूचा कंगवा वापरून डोक्याच्या त्वचेत जे नैसर्गिक तेल असते ते समप्रमाणात पसरत नाही परिणामी केस तुटतात मात्र लाकडी कंगव्याने हे तेल एकसारखे डोक्यावर पसरले जाते त्यामुळे केस अधिक हेल्दी आणि चमकदार बनतात. अनेकांची डोक्याची त्वचा मुळातच तेलकट असते. लाकडी कंगवा हे तेल सर्वत्र पसरवतो आणि केस कमी तेलकट दिसतात.

लाकडी कंगव्याचे दात टोकदार नसतात तर थोडे बोथट असतात. त्यामुळे हा कंगवा केसातील गुंता सहज काढतो आणि केसात घर्षण कमी झाल्याने केस तुटण्याचे प्रमाण कमी होते. केसाखालची त्वचा सेन्सिटिव्ह असेल तर धातू अथवा प्लास्टिक कंगव्याने ॲलर्जी येऊ शकते तो धोका लाकडी कंगव्यामुळे राहत नाही कारण लाकूड हे नैसर्गिक आहे.



# प्रेग्नेन्सीदरम्यान ताण ठेवा दूर

जर आपण गरोदर असाल, तर जितकं शक्य असेल तितकं ताण-तणावापासून दूर राहा. कारण एका अभ्यासात पुढे आलंय की, गरोदर महिलेच्या ताणामुळं संबंधित हार्मोन्सचा भ्रूणाच्या विकासावर परिणाम वाईट होतो.

**तणावा** संबंधीच्या हार्मोन्सचा उंदरांच्या पिल्लांवर काही परिणाम होतो का? याचा शोध घेण्यासाठी गर्भवती उंदराला ग्लूकोकॉर्टिकॉइड कॉर्टिकोस्टेरॉन हॉर्मोन दिलं गेलं. त्यानंतर संशोधकांना आढळलं की, या हार्मोनमुळे त्यांची भूक खूप वाढली. मात्र त्यांचा प्लासेंटातून भ्रूणाला मिळणाऱ्या ग्लूकोजची मात्रा कमी झाली. संशोधनाचे मुख्य लेखक ओवन वाउगन म्हणाले, निष्कर्षातून ही बाब समोर आली की, आईच्या शरीरात असलेलं तणाव हार्मोन ग्लूकोकॉर्टिकॉइड भ्रूणाच्या पोषणाला नियंत्रित करतं. आईच्या शरीरात या हार्मोनची मात्रा जितकी जास्त असेल तितका परिणाम भ्रूणाच्या विकासावर होईल. गर्भाचं वजन कमी होऊ शकतं. हा अभ्यास प्रबंध 'द जर्नल ऑफ फिजिओलॉजी' या मासिकात प्रकाशित झालाय.

# सब्जा खाण्याचे गुणकारी फायदे

तुळस भारतीय घरांतील पूजनीय झाड आहे. अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं लावलेलं पाहायला मिळतं. तुळस अनेक आजारांवर औषधी म्हणून काम करते. तुळशीचं बी म्हणजेच सब्जा शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सब्जाचं सेवन केल्याने शरीरात होत असलेला दाह कमी करण्यास मदत होते. सब्जा आपल्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकासासाठीही लाभदायक ठरतो. सब्जामध्ये कॅलरीज, प्रोटिन, कार्बोहायड्रेट, विटॅमिन ए, के, ई, बी, मॅग्नेशियम, फायबर, कॅल्शियम आणि पोटॅशियम असतं.



**वजन कमी करते**

सब्जा वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. सब्जामध्ये अल्फा-लिनोलेनिक ॲसिड असतं. यामुळे शरीरातील पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सब्जामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असतं त्यामुळे भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

**बद्धकोष्ठतेचा त्रास**

बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास सब्जा गुणकारी ठरतो. सब्जा शरीरातील डिटॉक्सिफिकेशनच्या प्रक्रियेत मदत करते आणि पोट, पचन क्रिया सुरळीत करून आतड्यांचे कार्य चांगले ठेवते. गरम पाण्यात सब्जा भिजवून रोज रात्री दुधासोबत घेतल्याने फायदा होतो. सब्जामुळे गॅससंबंधी समस्या दूर होण्यास मदत होते. पोटातील जळजळ, ॲसिडिटी कमी करण्यासही मदत होते.

**त्वचा**

प्रदूषणामुळे त्वचेवर मोठा परिणाम होत असतो. परंतु सब्जा त्वचेला ठीक करण्यासाठी फायदेशीर ठरतो. नारळाच्या तेलात सब्जा भिजवून त्याने त्वचेवर मसाज करा. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यास मदत होते.

**केसांसाठी फायदेशीर**

प्रदूषणामुळे केस निर्जीव होतात. सब्जात असणारी विटॅमिन, लोह, प्रोटीन अशी पोषक द्रव्ये केसांसाठी उपयोगी ठरतात. तेलात सब्जा भिजवून लावल्याने केस चमकदार होण्यास मदत होते.

**या आजारांवर गुणकारी**

मानसिक समस्या म्हणजेच टेन्शन, डिप्रेशन, मायग्रेन यांसारख्या आजारांवर सब्जा फायदेशीर ठरतो. सब्जाच्या सेवनाने उत्साही वाटते. उन्हाळ्याच्या दिवसांत पोट थंड राहते. सब्जाच्या सेवन केल्याने खाल्ल्यानंतर पोटात ॲसिडिसी कमी होते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. सब्जामुळे शरीरातील टॉक्सिन दूर होतात. त्यामुळे अनेक छोट्या-छोट्या समस्या कमी होतात. शरीराला एनर्जीही मिळते.

# ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट आवश्यक

उन्हाळ्यात घरातून बाहेर निघण्यापूर्वी सनस्क्रीन लावण्याचा सल्ला दिला जातो. उन्हात नाजूक त्वचेवर जळजळ होते आणि लाल डागदेखील पडू शकतात. अशात आज आम्ही आपल्याला असे काही उपाय सांगत आहोत ज्यामुळे त्वचेचं आरोग्य चांगले राहील आणि सौंदर्यप्रसाधने प्रॉडक्ट्सवर निर्भरता कमी. त्वचेच्या आरोग्यासाठी ब्युटी प्रॉडक्ट्सपेक्षा हेल्दी डायट अधिक आवश्यक आहे. त्वचेचं तारुण्य टिकून राहावं म्हणून प्रोटीन आणि व्हिटॅमिन सी अत्यंत आवश्यक आहे. याने त्वचेवर एक सुरक्षा परत तयार होते.

**योग्य आहार**



ˇ गाजरामध्ये व्हिटॅमिन्स ए भरपूर प्रमाणात आढळतं. याचे सेवन केल्याने पिंपल्स, पुरळ यासारख्या समस्या दूर होण्यास मदत मिळते. सोबतच त्वचेत रक्त संचार योग्यरीत्या होतं.

बीन्समध्ये जिंक आणि हायड्रोलिक ॲसिड आढळत ज्याने त्वचेत कोलाजन पातळी राखण्यास मदत मिळते.

ˇ शाईनी स्कीनसाठी आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड सामील करावे. मासे सेवन करणे त्वचा आणि केस दोघांसाठी फायदेशीर ठरतं.

ˇ ब्लूबेरीमध्ये अधिक प्रमाणात ॲटीऑक्सिडेंट्स आढळतं. ब्लूबेरीजचे सेवन केल्याने त्वचा खूप काळ सॉफ्ट राहते. याने हृदयासंबंधी तसेच कर्करोग यासारखे आजारदेखील टाळता येऊ शकतात.

ˇ उन्हाळ्यात आपल्या आहारात लाल सिमला मिरच्या, टोमॅटो आणि स्ट्रॅबेरीज सामील करा. याने त्वचेचं आरोग्य राखण्यास मदत मिळते.

# उन्हाळ्यात शिळं अन्न खाण्याचे ५ मोठे तोटे



**बिझी** शेड्यूल असल्यामुळे अनेक लोक एकत्र अन्न शिजवून वेळोवेळी फ्रीजमधून काढून वापरत असतात. तसे तर असे करणे योग्य नाही, तरी उन्हाळ्यात याबद्दल विशेष काळजी घेण्याची गरज असते. शिळ्या पदार्थांमध्ये बॅक्टेरिया वाढू लागतात आणि यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम दिसून येतात. किती वेळ पूर्वी तयार जेवण करणे योग्य ठरेल, असा प्रश्न आपल्या मनात असेल तर डॉक्टरांप्रमाणे चार ते पाच तास पूर्वी तयार अन्न खायला हरकत नाही, परंतु याहून अधिक वेळेपूर्वी तयार पदार्थ खाणे आपल्या आरोग्यासाठी योग्य ठरणार नाही. कापलेले फळ आणि भाज्या तर मुळीचं वापरू नये. याचे नुकसान जाणून घ्याः

**कर्करोगाचा धोका :** शिळं अन्न पोटातील कर्करोगाचा धोका निर्माण करतं. यातून आढळणारे बॅक्टेरियामुळे हायड्रोकार्बन आणि कॅन्सरचा धोका वाढतो.

**ताप येणे :** बॅक्टेरिअल इन्फेक्शनमुळे ताप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पोटदुखी :** शिळं अन्न खाल्ल्याने पोटात गॅस, ॲसिडिटी आणि पोटदुखी सारख्या समस्या झेलाव्या लागू शकतात. फ्रीजमध्ये गार झालेले अन्न खाल्ल्याने देखील पोटदुखीची तक्रार होते.


**फूड पॉइजनिंग :** उन्हाळ्यात तापमान अधिक असल्यामुळे खाद्यपदार्थांमध्ये बॅक्टेरिया लवकर पसरू लागतात. एक ते दोन तासांतच कीटाणूंची संख्या तिप्पट वाढते ज्यामुळे फूड पॉइजनिंग आणि लूज मोशनसारख्या समस्या उद्भवतात.

**अतिसार :** पचनतंत्र आणि प्रतिरक्षातंत्र कमजोर झाल्यामुळे उन्हाळ्यात शिळं अन्न सेवन केल्याने अतिसारचा धोका उद्भवू शकतो. यामुळे लूज मोशन, उलट्या, ताप देखील होऊ शकतो. अनेकदा शरीरात पाण्याच्या कमीमुळे धोका निर्माण होतो. फ्रीजमध्ये ठेवलेले डेअरी प्रॉडक्ट्स देखील अधिक दिवसापर्यंत वापरू नये. दूध उकळल्यावर ते त्याच दिवशी संपवावे.

# "...अन् ते माणूसपण उद्धवजींमध्ये पाहिलं", आदेश बांदेकरांनी सांगितला ठाकरे कुटुंबीयांचा अनुभव

'होम मिनिस्टर' या कार्यक्रमामुळे आज घराघरांत महाराष्ट्राचे भावोजी म्हणून आदेश बांदेकर यांना ओळखलं जातं. नाटक असो किंवा मालिका प्रत्येक माध्यमांत त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. अभिनयाची घडी व्यवस्थित सांभाळून पुढे ते समाजकारणात सक्रिय झाले. नुकत्याच लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत बांदेकरांनी ठाकरे कुटुंबीयांबरोबर आलेल्या अनुभवाविषयी सांगितलं आहे.

राजकारणातील खास मित्रांबद्दल विचारलं असता आदेश बांदेकर म्हणाले, "मी राजकारण म्हणणार नाही... मी समाजकारण म्हणेन. कारण, माझं बालपण लालबागच्या अभ्युदयनगरमधील असल्याने वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पहिल्यापासून माझ्यावर खूप प्रभाव होता. माझा जन्म १९६६ चा आहे आणि त्याचवर्षी शिवसेनेची स्थापना झाली होती. लालबागमध्ये शिवसेनेचा सुरू झालेला प्रवास बघत आम्ही मोठे झालो आहोत. ते संस्कार, भगव्याचं आकर्षण, वंदनीय बाळासाहेबांचं भाषण, दसरा मेळाव्याला



ढोल वाजवत जाणं या सगळ्या गोष्टी माझ्यासाठी लार्जर दॅन लाइफ होत्या."

आदेश बांदेकर पुढे म्हणाले, "दसऱ्या मेळाव्यात शेवटच्या कठड्यावर बसणारा एक शिवसैनिक जेव्हा साहेबांबरोबर स्टेजवर जातो हा संपूर्ण प्रवास होम मिनिस्टरमुळे सुखकर झाला. उद्धव ठाकरेंच्या रुपात माणूसपण जपलेला माणूस मला भेटला. रश्मी वहिनी, आदित्य, तेजस या सगळ्यांमुळे तुमच्या-आमच्यासारखं एक कुटुंब मला जोडता आलं ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे."

निवडणुकीची आठवण सांगताना अभिनेते म्हणाले, "२००९ मध्ये निवडणुकीला अवघे १३ दिवस बाकी राहिलेले असताना राजकीय परिस्थितीमुळे मी अचानक निवडणुकीला उभा राहिलो. खरंतर निकाल माझ्या विरुद्ध लागला आणि तेव्हा माझ्याकडे काहीच काम नव्हतं. त्यावेळी दोन-चार महिन्यांनी मला मोठ्या साहेबांनी बोलावलं. ते म्हणाले होते, 'आदेश तुला जे पाहिजे ते सांग, काय पाहिजे ते माग. मी सगळं तातडीने करायला तयार आहे. फक्त एक वचन दे तुज्या चेहऱ्यावरचं हसु कधीच कमी होऊ देऊ नकोस.' त्यांचं बोलणं ऐकून मी म्हणालो होतो, मला फक्त तुमचा आशीर्वाद द्या. आज कलाक्षेत्रात काम करत असल्याने मेहनत करणं हे माझ्या स्वभावात आहे. मी यापुढे हसत राहणार आणि लोकांना हसवत राहणार."

# 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मालिकेतील अभिनेत्रींनी गुजराती गाण्यावर धरला ठेका, ऑफस्क्रीन 'असं' आहे बॉण्डिंग

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' ही मालिका छोट्या पडद्यावर चांगलीच लोकप्रिय आहे. २०२२ मध्ये ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली. गेली जवळपास दीड वर्षे ही मालिका चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. यामधील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांचं मन जिंकलं आहे. तितीक्षा तावडे, अजिंक्य ननावरे, ऐश्वर्या नारकर, सुरुची अडारकर यांच्या या मालिकेत महत्त्वाच्या भूमिका आहेत.

मालिकेत तितीक्षाने नेत्रा, तर ऐश्वर्या नारकर यांनी रुपाली हे पात्र साकारलं आहे. रुपाली हे खलनायिकेचं पात्र असल्याने ती नेहमीच नेत्रा विरोधात कट रचत असल्याचं मालिकेत पाहायला मिळतं. परंतु, प्रत्यक्षात या मालिकेतील सगळ्याच अभिनेत्रींमध्ये खूप सुंदर असं ऑफस्क्रीन बॉण्डिंग आहे. या सगळ्या जणी मिळून नुकत्याच एका व्हायरल गुजराती गाण्यावर थिरकल्या आहेत.

'सातव्या मुलीची सातवी मुलगी' फेम एकताने तिच्या इन्स्टाग्रामवरून शेअर केलेला एक व्हिडीओ सध्या चर्चेत आला




आहे. 'व्हॅनिला आइस्क्रीम' चित्रपटातील 'हरखता मलकता' या गुजराती गाण्यावर सगळ्या अभिनेत्री थिरकत असल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. एकतासह तितीक्षा तावडे, अमृता रावराणे, ऐश्वर्या नारकर यांची झलक या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.

दरम्यान, या अभिनेत्रींच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी "आम्हाला या गाण्याचा अर्थ पण सांगा", "किती गोड व्हिडीओ आहे", "मस्तच", "एकदम सरस" अशा कमेंट्स केल्या आहेत.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | 3 | | 7 | | | 9 |
| 8 | | 4 | 1 | | | | | 7 |
| | | | | | | 4 | 5 | |
| 9 | 5 | 8 | 6 | | | 1 | | |
| | | | 2 | | 4 | 5 | | |
| 1 | | | 9 | | | | | |
| | | 3 | | 2 | | 7 | | 1 |
| 6 | 2 | 1 | | | | | 4 | |
| 5 | | | | 6 | | 3 | | |

## उत्तर सुडोकू -४५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 7 | 5 | 1 | 2 | 3 | 4 | 6 |
| 1 | 5 | 4 | 3 | 7 | 6 | 8 | 2 | 9 |
| 2 | 3 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 5 | 7 |
| 5 | 7 | 1 | 8 | 3 | 4 | 9 | 6 | 2 |
| 9 | 4 | 8 | 6 | 2 | 7 | 5 | 3 | 1 |
| 3 | 6 | 2 | 9 | 5 | 1 | 4 | 7 | 8 |
| 7 | 8 | 3 | 2 | 9 | 5 | 6 | 1 | 4 |
| 6 | 2 | 9 | 1 | 4 | 3 | 7 | 8 | 5 |
| 4 | 1 | 5 | 7 | 6 | 8 | 2 | 9 | 3 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### ३ एप्रिल

- ◆१९४८: ओरिसा उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
- ◆१९७३: मार्टिन कूपर या मोटोरोला कंपनीतील संशोधकाने जगातील पहिला मोबाइल कॉल केला.
- ◆१९७५: बॉबी फिशरने अनातोली कार्पोव्हविरुद्ध खेळण्यास नकार दिल्यामुळे अनातोली कार्पोव्ह हा बुद्धिबळात जगज्जेता बनला.
- ◆२०००: आयएनएस आदित्य हे इंधन पुरवणारे संपूर्ण भारतीय बनावटीचे वेगवान जहाज नौदलाच्या ताफ्यात दाखल झाले.
- ◆२०१०: ॲपल कंपनी ने आयपॅड या टॅब्लेट संगणकाची पहिली आवृत्ती जाहीर केली.
- ◆२०१६: पनामा पेपर्स हे कायदेशीर दस्तऐवज प्रसिद्ध होऊन सुमारे २,१४,४८८ कंपन्याची गोपनीय माहिती उगढ झाली.
- ◆१७८१: भारतीय धार्मिक नेते स्वामीनारायण यांचा जन्म. (मृत्यू: १ जून १८३०)
- ◆१८८२: सामाजिक ऐतिहासिक कादंबरीकार नाथमाधव यांचा जन्म. (मृत्यू: २१ जून १९२८)
- ◆१८९८: टाईम मॅगझिन चे सहसंस्थापक हेन्री लुस यांचा जन्म. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६७)
- ◆१९०३: मॅगसेसे पुरस्कार विजेत्या स्वातंत्र्यसैनिक कमलादेवी चट्टोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९८८)
- ◆१९०४: इन्डियन एक्सप्रेस वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक रामनाथ गोएंका यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑक्टोबर १९९१)
- ◆१९१४: फील्ड मार्शल सॅम माणेकशा यांचा जन्म. (मृत्यू: २७ जून २००८)
- ◆१९३०: जर्मन चॅन्सेलर हेल्मुट कोल्ह यांचा जन्म.
- ◆१९३४: इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ जेन गुडॉल यांचा जन्म.
- ◆१९५५: सुप्रसिद्ध गायक हरिहरन यांचा जन्म.
- ◆१९६२: चित्रपट अभिनेत्री आणि संसद सदस्य जयाप्रदा यांचा जन्म.
- ◆१९६५: पाकिस्तानी पॉप गायिका नाझिया हसन यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०००)
- ◆१९७३: भारतीय क्रिकेट खेळाडू निलेश कुलकर्णी यांचा जन्म.
- ◆१६८०: छत्रपती शिवाजी महाराज भोसले यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १६३०)
- ◆१८९१: फ्रेन्च गणिती एडवर्ड लूकास यांचे निधन. (जन्म: ४ एप्रिल १८४२)
- ◆१९८१: पॅन अमेरिकन वर्ल्ड एरलाईन्स चे स्थापक जुआन ट्रिप्प यांचे निधन. (जन्म: २७ जून १८९९)
- ◆१९८५: महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांचे निधन. (जन्म: १३ मार्च १८९३)
- ◆१९९८: इंग्लिश गणितज्ञ मेरी कार्टराइट यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९००)
- ◆१९९८: प्रसिद्ध गुजराती कादंबरीकार हरकिसन मेहता यांचे निधन.
- ◆२०१२: भारतीय राजकारणी गोविंद नारायण यांचे निधन.

## भविष्य

**मेष** तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वर्गाला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

**वृषभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

**मिथुन** मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

**कर्क** मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळावे.

**सिंह** जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

**कन्या** पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

**तुला** पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

**वृश्चिक** बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खर्चाचे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

**धनु** रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

**मकर** सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवर्गापासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळा.

**कुंभ** मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

**मीन** वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# टाकसाळ आणि टिनपाट

तगड्या बुद्धिवंतांची, निर्भीड प्रशासकांची देदीप्यमान परंपरा रिझर्व्ह बँकेस आहे. नव्वदीनंतरही ती जपण्याची जबाबदारी देशातील समंजस व सुशिक्षितांची... संस्था मोठ्या कधी होतात? त्या संस्था हाताळणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना मोठे होण्याचे स्वातंत्र्य दिले की ही माणसे मोठी होतात आणि स्वतः मोठे होण्याच्या प्रवासात आपल्या संस्थेलाही मोठे करतात. अशी आपल्या देशातील मोठी झालेली संस्था म्हणजे रिझर्व्ह बँक. सोमवारी ती नव्वदाव्या वर्षात पदार्पण करती झाली. खरे तर यानिमित्ताने आयोजित सोहळ्यात कोणी आंतरराष्ट्रीय ख्यातीचा तज्ज्ञ मार्गदर्शन करता अथवा रिझर्व्ह बँकेच्या हयात असलेल्या नामवंत माजी गव्हर्नरांस बोलावून काहीएक बौद्धिक कार्यक्रम होता तर ते त्या बँकेच्या उच्च बौद्धिक परंपरेस साजेसे ठरले असते. तसे काही झाले नाही आणि एखाद्या नव्या 'वंदे भारत'ला हिरवा झेंडा दाखवण्यासारखा कार्यक्रम झाला. हे साजेसेच म्हणायचे. परंतु असे वारंवार होत राहिले की मोठ्या संस्था लहान लहान होऊ लागतात. मग अशा लहान होऊ लागलेल्या संस्था हाताळण्यास लहान माणसांचीच नियुक्ती केली जाते. मग ही लहान माणसे सदर संस्थेस आणखी लहान करतात. हे झाले सर्वसाधारण मत. हे सर्व रिझर्व्ह बँकेस असेच्या असे लागू होते असे निदान आजच्या वर्धापनदिनी तरी बोलणे बरे नाही. तो औचित्यभंग ठरेल. तेव्हा या असल्या प्रासंगिक क्षुद्र मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून रिझर्व्ह बँकेच्या देदीप्यमान इतिहासाची उजळणी आजच्या दिनी करणे समयोचित ठरेल. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेत अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा वाटा आहे हे अनेकांस ठाऊक नसेल. बाबासाहेब अर्थशास्त्र शिक्षणासाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे असताना रुपयाची किंमत काय असावी यावरून त्यांची अर्थतज्ज्ञ लॉर्ड केन्स इत्यादींशी मोठी बौद्धिक झटापट झाली. त्या वादातूनच पुढे रुपयाच्या मूल्यनिश्चितीसाठी ब्रिटिश सरकारने एक तज्ज्ञ समिती नेमली आणि कालौघात तिच्यातूनच रिझर्व्ह बँक आकारास आली. सुरुवातीचे या बँकेचे गव्हर्नर हे ब्रिटिश होते; पण त्यांच्याच काळात चिंतामणराव देशमुख यांची या पदासाठी निवड झाली. कालिदासाचे शाकुंतल ते मार्क्स वा अन्यांचा अर्थविचार अशा भव्य परिघात देशमुख यांची बुद्धिमत्ता लीलया फिरत असे. उत्कृष्ट इंग्रजीप्रमाणेच देशमुखांचे संस्कृतवरही प्रभुत्व होते आणि आपल्या काही कार्यालयीन सहकाऱ्यांस ते संस्कृतातून सूचना देत. त्या वेळी म्यानमारची आणि फाळणीनंतर काही काळ पाकिस्तानचीही जबाबदारी आपल्याच रिझर्व्ह बँकेकडे होती. पं. नेहरू यांनी रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रयत्न केला असता चिंतामणरावांनी देशाच्या पहिल्या पंतप्रधानास यासाठी विरोध केला. पण तरीही चिंतामणराव आणि पं. नेहरू यांच्यातील संबंधांत त्याची जराही बाधा आली नाही आणि त्याचमुळे ते अर्थमंत्रीपदही भूषवू शकले. इतकेच काय चिंतामणरावांच्या विवाहात पं. नेहरू ह्यवधुपक्षाह्नचे यजमान होते. वैचारिक मतभेदांचा असा आदर केला जाण्याचा असा लोभस काळ रिझर्व्ह बँकेस अगदी अलीकडेपर्यंत अनुभवता आला. अलीकडचे ह्यत्या काळचेह्न वाटावे असे उदाहरण म्हणजे रघुराम राजन यांची नियुक्ती. माँतेकसिंग अहलुवालिया यांच्या पत्नी इशर यांनी सुमारे १२ वर्षांपूर्वी दिल्लीत आयोजित केलेल्या चर्चासत्रात सहभागी एका तज्ज्ञाने पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यादेखत सरकारी आर्थिक वैगुण्ये दाखवली. त्यावर त्याचा राग न धरता मनमोहन सिंग यांनी या तज्ज्ञास आर्थिक सल्लागारपद दिले आणि नंतर हे रघुराम राजन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरही झाले. त्याहीआधी अर्थमंत्रीपदी चिदम्बरम असताना देशातील खासगी बँकांच्या रेट्यामुळे अमेरिकेतील डेरिव्हेटिव्हसारखी आर्थिक उत्पादने भारतातही सुरू केली जावीत असा आग्रह त्यांनी धरला. त्या वेळचे गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी चिदम्बरम यांच्या दबावास जराही भीक घातली नाही आणि त्यामुळे जागतिक बँकिंग संकटकाळात भारतीय बँकांस त्याची झळ लागली नाही. ही अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यातील नायकांमुळे, म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळच्या गव्हर्नरांमुळे, रिझर्व्ह बँकेची ध्वजा नेहमीच उंच फडफडत राहिली. तथापि असाच अनुभव ऊर्जित पटेल यांचाही होता असे म्हणता येत नाही. केंद्र सरकारला लाभांश देण्यास विरोध केला म्हणून देशातील सत्ताधाऱ्यांनी गव्हर्नर पटेल यांच्याबाबत काय उद्गार काढले हे सर्वश्रुत आहे आणि निश्चलनीकरणाबाबत रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांस सत्ताधाऱ्यांनी कशी केराची टोपली दाखवली हेदेखील सर्व जाणतात. आता तर त्या निश्चलनीकरणाचा फोलपणा न्यायाधीशही जाहीरपणे दाखवू लागले आहेत. हा सगळा काळ रिझर्व्ह बँकेच्या गौरवाचा म्हणता येत नाही. आपल्या बुद्धिवैभवासाठी ब्रिटिश सरकारलाही ज्यांस गौरवावे वाटले असे आय जी पटेल, मनमोहन सिंग, बिमल जालान, सुब्बा राव, सी रंगराजन अशा एकापेक्षा एक तगड्या बुद्धिवंतांची आणि निर्भीड प्रशासकांची देदीप्यमान परंपरा रिझर्व्ह बँकेस आहे. निश्चलनीकरण वा आर्थिक तंगीवर उपाय म्हणून केंद्र सरकारला वारंवार लाभांशाचे घास भरवणे इत्यादींमुळे ही परंपरा खंडित होते किंवा काय असा प्रश्न कोणास पडत असल्यास ते गैर म्हणता येणार नाही. याबरोबरीने आणखी एक खंत मराठी माणसांस असू शकेल.

# डॉक्टरांच्या अत्यावश्यक सेवेचे महत्त्व नाकारण्याऐवजी हे करा...

अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामाला जुंपू नये अशा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्यानंतरही राज्यातील काही भागांत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांतील डॉक्टरांच्या सेवा लावल्या जात असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने केला आहे. मुंबई महापालिकेच्या अखत्यारीत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांच्याही निवडणुकीत सेवा लावल्या जात होत्या. हा प्रकार पुढे आल्यावर निर्णय मागे घेण्यात आला. परंतु आता छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टरांच्याही निवडणूक कामात सेवा घेण्याबाबतचे आदेश निघाले आहेत.

अत्यावश्यक असलेली आरोग्य सेवा खोळंबून रुग्णांचे हाल झाले तरी चालतील. पण निवडणुकीची सेवा मात्र चोख झाली पाहिजे... आरोग्य सेवेपेक्षा निवडणूक सेवा इतकी महत्त्वाची आहे का? केवळ 'आयुष्मान भारत कार्ड काढा,' असे सांगून चालत नाही. आरोग्य सेवा कधीच ठप्प पडणार नाही- त्यासाठी आपलेच आदेश कारणीभूत ठरणार नाहीत- याची काळजी घेतली पाहिजे.

शासकीय रुग्णालयांच्या डॉक्टरांना प्रतिदिन बाह्य रुग्ण विभाग, अतिदक्षता विभाग, अपघात विभाग येथे विशेषतः महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या रुग्णांचा प्रचंड ताण असतो. आश्चर्य याचे वाटते की, असे असतानाही डॉक्टरांना लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी सेवा लावणे आणि नंतर तो निर्णय मागे घेणे. मुळात आरोग्य सेवेतील कर्मचारी अत्यावश्यक सेवेत येतात. तसेच निवडणूक आयोगाच्या निकषानुसार अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी - अधिकारी यांना निवडणूक कालावधीत सेवा लावू नये. असे असूनही बघूया



सेवा लावून कितपत विरोध होतो; आदेश शांतपणे स्वीकारला जातो का; असा विचार करून निर्णय रेटून नंतर त्यावर माघार घेण्यात आली, असे दिसते. तरी विषय येथेच समाप्त होत नाही. कारण निवडणूक आयोगाच्या निकषालाच धुडकावून पाहण्याचा डाव येथे टाकून त्याचे काय परिणाम होतात, याचीच परीक्षा इथे घेतली जाते आहे.

रुग्णालयाकडे येणाऱ्या रुग्णांची ओपीडी लोकप्रतिनिधी - प्रशासकीय अधिकारी यांच्या शासकीय निवासस्थानी भरवायची का? जेणेकरून त्यानिमित्ताने तरी यांना कळेल की डॉक्टरांवर रुग्ण सेवेचा किती ताण असतो! यांच्या तुलनेत आपण प्रतिदिन किती काम करतो, हे सुद्धा प्रत्यक्ष पाहता येईल. अर्थातच डॉक्टरांच्या कामाचे पारडे कायम जड असेल यात दुमत नाही. काही डॉक्टर तर १२ - १८ तास सेवा देतात. तर काही २४ तास सेवारत असलेले पाहिले आहेत. कधी सहकारी डॉक्टर आजारी असतो, त्याची साप्ताहिक सुट्टी असते, सुट्टी घेऊन गावी गेलेला असतो. असे असले तरी रुग्ण सेवेत खंड पडू न देता, ती अविरतपणे चालू ठेवण्याची मोलाची भूमिका पार पाडणाऱ्या डॉक्टरांचे कौतुक करण्यास शब्दही अपुरे आहेत. यांचे काम जिकिरीचे आहे. हे सामान्य लोकांना कळते. पण लोकप्रतिनिधी - प्रशासकीय अधिकारी यांना त्याविषयी जाणून घेण्यात काडीचाही रस नाही.

म्हणून तर कीव वाटते हा आदेश काढणाऱ्यांची. कोरोना काळात 'कोरोना योद्धे' म्हणून ज्यांचा सत्कार झाला; त्यांचा एवढ्या लवकर विसर कसा पडू शकतो? यांच्या अहोरात्र निस्वार्थी सेवेमुळे कैक करोना रुग्णांचे प्राण वाचले आहेत. तो वाईट काळ निघून गेला. आता निवडणूक आहे. त्याचे काम झाले पाहिजे. असा भ्रम झाला आहे आणि अत्यावश्यक सेवा अल्प दर्जाची वाटू लागली आहे. आदेशाच्या आडून सेवेचे महत्त्व अल्प करू पाहणाऱ्यांपासून कायम सावध असले पाहिजे. कसला मागचा पुढचा विचार नाही. बैल जसे घाण्याला जुंपतात तसे घाण्याला जुंपायला आयते शासकीय डॉक्टर आहेत. हा कोता विचार घातक आहे.

नगरसेवक, आमदार, खासदार यांपैकी कोणीतरी शासकीय रुग्णालयांकडे फिरकतात का? त्याची वारंवारिता किती आहे ? डॉक्टर, परिचारिका यांवर असणारा कामाचा भार, काय उपलब्ध आहे किंवा नाही. अन्य काही अडचणी आहेत का ? याविषयी पाच वर्षांत जाणून घेण्याची तसदी घेतली जाते का? याचे उत्तर जवळपास नाही असेच आहे. मग रुग्णालयाची व्यवस्था होतंय-जातंयह्न चाललंय अशीच आहे, असे म्हणावे लागेल. रुग्णांच्या रोषाला डॉक्टर - परिचारिका यांना तोंड द्यावे लागते. यांच्यात होणारे वाद कधीकधी टोक गाठतात. तेव्हा अत्यावश्यक सेवेच्या निघत असलेल्या वाभाड्यांवर ठोस उपाययोजना काढून रुग्णांना दिलासा देऊया असे कोणाला वाटते तरी का ?

# विरोधकांची 'इंडिया' पुढे काय करणार?

राज्या-राज्यांत भांडणाऱ्या 'इंडिया'तील घटक पक्षांचा गोतावळा दिल्लीत एकत्र आला हे बरे झाले. भाजपेतर पक्षांना नेमके काय म्हणायचे आहे आणि ते भाजपविरोधात का लढत आहेत, हे दोन्ही मुद्दे विरोधकांना नेमकेपणाने रामलीला मैदानावरून देशभर पोहोचवता आले. २०२४ ची लोकसभेची निवडणूक खुली आणि निष्पक्ष होण्यात भाजप जाणीवपूर्वक अडथळे आणत आहे, देशात लोकशाही व्यवस्था टिकवायची असेल तर भाजपची दादागिरी खपवून घेतली जाणार नाही, केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असून तिने हस्तक्षेप करून भाजपकडून विरोधी पक्षांची होणारी गळचेपी थांबवली पाहिजे, असा 'इंडिया'च्या नेत्यांचा सभेतील सूर होता. विरोधकांच्या गळचेपीच्या आरोपांमध्ये प्रथमदर्शनी तरी तथ्य दिसते.

लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर प्राप्तिकर विभागाला काँग्रेसच्या कर परताव्यातील अनियमिततांची आठवण झाली. बँक खाती गोठवत क्रमाक्रमाने दंडाची रक्कम वाढवण्यात आली. ३१ मार्च रोजी हा दंड ३ हजार ५०० रुपये होता. सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी झाल्यावर मात्र प्राप्तिकर विभागाने 'लोकसभा निवडणूक होईपर्यंत आम्ही कारवाई करणार नाही', अशी साळसूद भूमिका घेतली. हे शहाणपण आधी का आले नाही, या प्रश्नामध्ये गळचेपीचे सत्य दडलेले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांना तुरुंगात टाकून मोदींच्या धक्कातंत्राचा वापर केला असावा असा भास होतो. 'ईडी' हीदेखील स्वायत्त संस्था असेल तर तिने निवडणुकीच्या काळातच केजरीवालांना का अटक केली, ते दोषी असतील तर त्यांना वर्षभरापूर्वी अटक का झाली नाही? 'ईडी'ने साधलेली वेळ गळचेपीचे वास्तव कथित करते. खरे तर नव्या कायद्यामुळे




केंद्रीय निवडणूक आयोग तरी स्वायत्त राहिला आहे का, हा प्रश्न विचारता येऊ शकतो! आयुक्तांच्या निवड समितीतील तिघांपैकी दोघे सदस्य सरकारी गटात; त्यात खुद्द पंतप्रधान आणि दुसऱ्या गटात एकटा विरोधी पक्षाचा नेता. बहुमताने निवड होत असल्यामुळे त्या एकट्याचा विरोध बोथटच होणार. अशा सगळ्या कोंडमाऱ्यांना विरोधकांनी राजधानीत येऊन वाट काढून दिली.

भाजप राजकीय आणि प्रचंड आर्थिक सत्तेच्या मदतीने निवडणुकांचे स्वरूप एकतर्फी बदलून टाकत असल्याच्या आरोपावर, 'आम्ही यंत्रणांच्या कारभारात हस्तक्षेप करत नाही, तुम्ही कायदा मोडलात म्हणून तुम्हाला शिक्षा होते', असे भाजपला म्हणता येईल. पण हा युक्तिवाद पुरेसा नाही. केंद्रातील सत्ताधारी पक्ष लोकसभा निवडणुकीच्या काळात निष्पक्ष भूमिका घेत आहे, हे लोकांना दिसले आणि पटले पाहिजे. तसे नसेल तर विरोधकांनी निवडणूक प्रक्रियेवर शंका घेतली तर चुकले कुठे?

रामलीला मैदानावर 'इंडिया'ने प्रश्न उभे केले हे खरे, आता विरोधक पुढे काय करणार, असे विचारणे अधिक सयुक्तिक ठरते. रविवारच्या सभेत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी एकट्याने 'इंडिया'च्या ऐक्याचा मुद्दा मांडला. 'इंडिया'तील ऐक्य टिकले नाही तर भाजपचा पराभव कसा करणार, असा मूलभूत प्रश्न खरगेंनी विचारला. फक्त सभेसाठी घटक पक्षांचे नेते सामील होत असतील आणि राज्यांमध्ये वेगळीच भाषा केली जात असेल तर रामलीला मैदानातील ऐक्यदर्शनाचा काय फायदा? देशभर लोकांना 'इंडिया'चे ऐक्य दिसले पाहिजे, नेत्यांना ते कृतीतून सिद्ध करता आले पाहिजे आणि भाजपला 'इंडिया' पराभूत करू शकतो असा विश्वास लोकांना वाटला पाहिजे. भाजप पक्षपातीपणा करून लोकसभा निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत असल्याचा व विरोधकांची कोंडी करत असल्याचा भावनिक मुद्दा मतदारांना भावला तरच 'अबकी बार भाजप तडीपार'चा नारा वास्तवात येईल. दिल्लीत झालेल्या सभेची पुनरावृत्ती राज्या-राज्यांमध्ये झाली तरच देशभर माहोल तयार होऊ शकेल. या सभांना प्रतिनिधींना न पाठवता ममता बॅनर्जींना यावे लागेल. दिल्लीतील ही 'इंडिया'ची निवडणूक प्रचाराची पहिली सभा म्हणता येईल. सुरुवात दमदार झाली. भरगच्च मैदानातील वातावरणाची चाहूल घेतली तर भाजपविरोधी वातावरण निर्माण करता येऊ शकते याची प्रचीती येईल. मात्र 'इंडिया'च्या तलवारीची धार बोथट होऊ न देण्यासाठी नेते पुढे काय करणार, यावरच मतदारांचा प्रतिसाद अवलंबून राहील.

# जे. जे. रुग्णालयात ४३ हजार एचआयव्ही रुग्णांवर उपचार, पहिल्या एआरटी केंद्राला २० वर्षे पूर्ण

**मुंबई** : एचआयव्हीचा संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या वाढू लागल्यानंतर एचआयव्ही संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी जे.जे. रुग्णालयामध्ये १ एप्रिल २००४ रोजी पहिले एआरटी केंद्र सुरू करण्यात आले. या केंद्राला २० वर्ष पूर्ण झाली असून, या २० वर्षांमध्ये जे.जे. रुग्णालयामध्ये ४३ हजार ८० रुग्णांवर वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत. सध्या जे.जे. रुग्णालयामध्ये तीन एआरटी केंद्र कार्यरत आहेत.

जे.जे. रुग्णालयामध्ये १ एप्रिल २००४ मध्ये डॉ. अलका देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली एआरटी केंद्राची सुरूवात करण्यात आली. १४ सप्टेंबर २०१६ रोजी दुसऱ्या एआरटी तर १ डिसेंबर २०१७ ला तिसऱ्या एआरटी केंद्राला सुरूवात करण्यात आली. आतापर्यंत पहिल्या व दुसऱ्या एआरटी सुविधेतर्गत ४३ हजार ०८० रुग्णांना वैद्यकीय उपचार देण्यात आले आहे. त्यातील पहिल्या एआरटी केंद्रामध्य ५०९५, तर दुसऱ्या एआरटी केंद्रामध्ये ११९१ आणि तिसऱ्या एआरटी केंद्राच्या माध्यमातून ३७९ रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळाले आहेत.

एचआयव्हीसह जगणाऱ्या रूग्णांना विनामूल्य मिळणाऱ्या




या औषधांमुळे दिलासा मिळाला. जेजे रुग्णालयामध्ये सुरू झालेल्या या पहिल्या एआरटी केंद्राला आज २० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त आयोजित विशेष सोहळ्यामध्ये जे. जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, एमडॅक्सचे विजयकुमार करंजकर, नोडल अधिकारी डॉ. प्रिया पाटील, डॉ. धीरुभाई राठोड, तसेच मागील काही वर्षापासून वैद्यकीय उपचार घेत असलेल्या रुग्णांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

**तरीही वर्षाला सहाशे रुग्णांचे आव्हान कायम**

२० वर्षांपूर्वी रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचारासाठी येणाऱ्या एचआयव्हीग्रस्त मुलांची संख्या मोठी होती. त्यात आता घट झाली आहे. मात्र तरीही प्रत्येक वर्षी रुग्णालयाच्या एआरटी केंद्रामध्ये ६०० रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी येतात. विविध पातळ्यांवर एचआयव्ही आजाराचा संसर्ग, त्याची कारणे, प्रतिबंधात्मक उपचार याबद्दल सातत्याने जनजागृती केली जाते. एचआयव्ही रुग्णांची संख्या कशी कमी करता येईल यावर विचार करण्याची गरज रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केली.

**नवीन आयुष्य भेट मिळाले**

एआरटी केंद्राने २० वर्षांची पूर्तता केल्यासंदर्भात सुरू येथील वैद्यकीय सुविधेचा लाभ घेतलेल्या रुग्णांनीही त्यांचे मनोगत व्यक्त केले. आशाला (नाव बदलले आहे) एचआयव्हीचा संसर्ग झाला तेव्हा तिच्या कुटुंबाने तिच्या जगण्याची उमेद सोडून दिली होती. त्यावेळी तिची मुलगी चार वर्षाची होती. मुलगी कळती होईपर्यंत तरी हिला जगवा, अशी विनवणी तिच्या पालकांनी केली होती. आशाने एआरटी उपचारपद्धती व्यवस्थित घेतली. एचआयव्हीसह ती मागील चोवीस वर्ष सर्वसामान्यांप्रमाणे आयुष्य जगत आहे.

# दिल्लीवरून मुंबईत महागड्या विदेशी मद्याची तस्करी



**मुंबईः** दिल्लीहून मुंबईत महागड्या विदेशी मद्यांची तस्करी करणाऱ्याला राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने ताब्यात घेतले. या तस्कराच्या मोटारीतून आणि घरातून विदेशी मद्याच्या तब्बल २०५ बाटल्या हस्तगत करण्यात पथकाला यश आले.

दिल्लीतून आलेला विदेशी मद्याचा साठा बेकायदेशीरपणे एका व्यक्तीकडे असल्याची माहिती भरारी पथक-२ ला मिळाली. ती व्यक्ती वरळी येथे येणार असल्याची माहिती मिळताच निरीक्षक प्रकाश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सतीश शिवलाल पटेल (३५) याला मोटरगाडीतून विदेशी मद्यांची तस्करी करताना वरळी येथे पकडले. त्याच्या गाडीची तपासणी केली असता मद्याच्या काही बाटल्या आढळल्या.

त्यानंतर, चौकशीत राहत्या घरात आणखी मद्यांचा साठा केला असल्याचे सतीश याने सांगितले. त्यानुसार, पथकाने सतीश याच्या अंधेरी लोखंडवाला येथील अलिशान घराची तपासणी केली असता तेथे विदेशी मद्याच्या विविध कंपन्यांच्या १०८ बाटल्या सापडल्या. तब्बल १४ लाख ३९ हजार रुपये किमतीच्या त्या विदेशी स्कॉचच्या बाटल्या असून गुन्ह्यात वापरलेली गाडी देखील हस्तगत करण्यात आली आहे.

सतीश याच्याकडे सापडलेला विदेशी मद्यांचा साठा गुरगावहून दिल्ली आणि दिल्लीहून रेल्वेने मुंबईत आणण्यात आला होता. मोहम्मद नावाचा व्यक्ती दारूची मागणी करून ते मुंबईत आणतो. त्यानंतर ते मद्य मुंबईत विकण्यासाठी माझ्याकडे देतो, अशी माहिती सतीशने चौकशीत दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. भरारी पथक मोहम्मदचा शोध घेत आहे.

## Electricity consumers to pay more as power companies hike tariff

# Tata Power users to pay up to 59%

**Mumbai**

Electricity consumers, who usually get inflated bills during summer, will now have to pay more due to a significant hike in power tariff from Monday, April 1. Tata Power consumers will face a hike of around 44 to 59% and consumers of Maharashtra State Electricity Distribution Company Ltd (MSEDCL) will face a tariff hike of 5.7 %.

MSEDCL residential consumers using up to 100 units per month will have to pay 30 paise more per unit. For 101 to 300 units hike would be 65 paise per unit, for 301 to 500 units, the hike will be 94 paise per unit and for usage above the 500 units per month electricity, consumers will have to pay ₹1.07 per unit.

Tata Power consumers in suburban Mumbai will face the highest tariff shock. Residential consumers using up to 100 units per month will have to pay ₹1.99 extra per unit while for 101 to 300 units, the hike would be ₹2.69 per unit. For 301 to 500 units, the hike would be ₹5.33 per unit. Consumers using more than 500 units of electricity per month will pay ₹5.67 per unit extra from April 1 than the previous year. This hike will be in the range of a whopping 44% to 59 %. Tata Power has a consumer base of around 7.5 lakh.



No respite for BEST residential electricity consumers as using up to 100 units per month will cost them 15 paise per unit extra now. For usage of 101 to 300 units, the hike is 39 paise per unit, for usage of 301 to 500 units hike will be 90 paise per unit. For usage of more than 500 units per month, the tariff hike will be ₹1.10 per unit. BEST supplies power to around 10.50 lakh consumers, including residential, commercial, and industrial consumers.

Around 31 lakh electricity consumers of Adani Electricity Mumbai Ltd will face the lowest electricity tariff hike in comparison to consumers of other power utilities. Adani residential consumers using up to 100 units per month will have to pay only 9 paise per unit extra. For the use of electricity 101 to 300 units per month hike will be 24 paise per unit. For 301 to 500 units, the hike will be only 4 paise per unit and consumers using above 500 units of electricity will pay one paise less than the earlier tariff.

While commenting on the power tariff hike power sector expert Ashok Pendse referred to the hike by Tata Power as a "mega power tariff shock to its consumers." A few years back the rate of commercial and industrial power of Tata Power company was high and they used to cross-subsidise the residential consumers. Later the commercial and industrial power tariff of Tata Power was reduced. So the cross subsidy of residential consumers decreased. As a result, Tata Power residential consumers will face mega power tariff shock this year." said Pendse.

Pratap Hogade president of Maharashtra State Power Consumers Federation said that MSEDCL power consumers will face an average 5.7 % tariff hike and if we consider Fuel Adjustment Charge (FAC) it's around 9.8 %. He also warned that due to high demand this summer consumers will have to suffer again in the form of FAC again.

Deputy chief minister Devendra Fadnavis who is also the power minister said, "The tariff has been approved by the Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC), but the structure has been revised in such a way that residential consumers do not face any burden."

# Mayank Yadav's record lasts 2 days as Gerald Coetzee clocks fastest ball of IPL 2024, misses all-time feat by a whisker

**Mumbai**

Mumbai Indians fast bowler Gerald Coetzee may not have lived up to the expectations yet, having picked only three wickets so far in three matches in IPL 2024, which included a wicketless outing at the Wankhede Stadium against Rajasthan Royals on Monday, but the South Africa star got his name into history books after he pipped Mayank Yadav to record the fastest delivery in IPL 2024.

It was barely two nights ago, at the Ekana Stadium in Lucknow when Lucknow Super Giants bowler Mayank, making his debut in the match against Punjab Kings, clocked a 155.8 kmph delivery that left PBKS captain Shikhar Dhawan "surprised". His stellar middle-over spell comprised nine 150-plus thunderbolts and three wickets, for 27 runs, as cricket fraternity watched the young Indian pacer in awe.

However, on Monday, Mayank's record was broken by Coetzee, who dished out a 157.4 kmph snorter during the IPL 2024 match against Rajasthan. It came in the last ball of Rajasthan's successful chase at the Wankhede, with Riyan Parag, who




just celebrated his half-century, getting the top-edge to the shorter delivery as the ball flew high over the wicketkeeper's head for a boundary.

**Here is full list of fastest deliveries in IPL 2024:**

- 157.4 kmph - Gerald Coetzee - MI vs RR
- 155.8 kmph - Mayank Yadav - LSG vs PBKS
- 153.9 kmph - Mayank Yadav - LSG vs PBKS
- 153.4 kmph - Mayank Yadav - LSG vs PBKS
- 153 kmph - Nandre Burger - RR vs DC
- 152.3 kmph - Gerald Coetzee - MI vs SRH
- 151.2 kmph - Alzarri Joseph - RCB vs KKR
- 150.9 kmph - Matheesha Pathirana - CSK vs GT

Not only did Coetzee top the IPL 2024 charts with that scorcher against the Royals, but also entered the all-time IPL list, albeit missing out on the 13-year-old record by Shaun Tait by a whisker. the Aussie legend remains at the top with his 157.71 kmph delivery in IPL 2011.

**Fastest deliveries in IPL history:**

- Shaun Tait 157.71 kmph - 2011
- Gerald Coetzee 157.4 kmph - 2024
- Lockie Ferguson 157.3 kmph - 2022
- Umran Malik 157 kmph - 2022
- Anrich Nortje 156.22 kmph - 2020
- Umran Malik 156 kmph - 2022
- Mayank Yadav 155.8 kmph - 2024

Coetzee was roped in by Mumbai the mini-auction last December following his heroics at the 2023 World Cup in India, where he had become the first-ever South Africa bowler to pick 20 wickets in a single edition of the 50-over event. This was preceded by a breakout season in the SA20 last year, where he picked 23 wickets. However, the right-armer has so have managed only three wickets in three matches for Mumbai at an economy rate of 11.43

# मुंबई महापालिकेची छप्परफाड कमाई!

## एका वर्षात वसुल केला ३ हजार १९६ कोटींचा मालमत्ता कर

■ मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत असलेल्या मालमत्ता कराचे काल (दिनांक ३१ मार्च २०२३) रात्री बारा वाजेपर्यंत म्हणजे सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात ३ हजार १९५ कोटी ९१ लाख ११ हजार रुपए इतके संकलन करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना महानगरपालिकेद्वारे विविध नागरी सेवा-सुविधा देण्यात येतात. या अनुषंगाने 'मालमत्ता कर' हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे.

हा 'मालमत्ता कर' नागरिकांनी वेळेत महानगरपालिकेकडे भरणा करावा, यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करनिर्धारण व संकलन खात्याने वर्षभर प्रयत्न केले आहेत. परिणामी, दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत मालमत्ता कराची वसुली ही ३ हजार १९५ कोटी ९१ लाख ११ हजार रुपए इतकी झाली आहे, अशी माहिती सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन)सुनील धामणे यांनी दिली आहे.

करनिर्धारण व संकलन विभागातर्फे आर्थिक वर्ष २०२३-२०२४ ची सुधारित मालमत्ता कर देयके फेब्रुवारी २०२४ अखेरीस निर्गमित झाल्यानंतर निर्धारित कालावधीत कर भरण्याबाबत नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात आले.

निर्धारित कालावधीत नागरिकांना मालमत्ता कराचा भरणा करता यावा, यासाठी साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टींच्या दिवशी नागरी सुविधा केंद्र सुरू ठेवण्यात आली. मोठ्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. तसेच, मागील थकबाकी वसुलीसाठी परिश्रम घेण्यात आले. परिणामी, दिनांक १९ मार्च २०२४ रोजी एकाच दिवसात तब्बल १०० कोटी रुपये, दिनांक २८ मार्च २०२४ रोजी ३०४ कोटी रुपए, दिनांक २९ मार्च २०२४ रोजी १७१ कोटी रुपए, दिनांक ३० मार्च २०२४ रोजी १७१ कोटी रुपए आणि दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी १९० कोटी ३४ लाख रुपयांचे विक्रमी संकलन करण्यात करनिर्धारण व संकलन विभागाला यश आले.

दिनांक १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च, २०२४ या आर्थिक वर्षामध्ये सर्वाधिक मालमत्ता कर संकलन हे 'एच पूर्व' विभागामध्ये रुपये ३३६.४५ कोटी इतके झाले आहे. त्या खालोखाल 'के पूर्व' विभागामध्ये ३१७.४८ कोटी रुपये इतकी, 'जी दक्षिण' विभागामध्ये २५७.११ कोटी रुपये मालमत्ता कर संकलन झाले आहे.



बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे या तिन्ही भागातील मालमत्ता कर संकलनाचा विचार केल्यास सर्वाधिक कर संकलन हे पश्चिम उपनगरांमध्ये १,५९०.०९ कोटी रुपये, शहर भागात ९१७.०५ कोटी रुपये आणि पूर्व उपनगरांमध्ये ६७८.४२ कोटी रुपये इतके मालमत्ता कर संकलन झाले आहे. मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण मालमत्तांची संख्या ९ लाख ५५ हजार ३८ इतकी आहे. त्यापैकी ५०० चौरस फूट (४६.४५ चौरस मीटर) व त्यापेक्षा कमी चटईक्षेत्र असणारय़ा निवासी इमारती / निवासी सदनिकांना संपूर्ण मालमत्ता करातून सूट देण्यात आली आहे. या मालमत्तांची संख्या ३ लाख ५६ हजार ६५२ इतकी आहे. तर, उर्वरित ५ लाख ९८ हजार ३८६ मालमत्तांना कर आकारणी केली जाते. सन २०२३-२४ मध्ये २ लाख ५३ हजार ६०५ मालमत्ता धारकांनी मिळून एकूण वर्षात ३ हजार १९५ कोटी ९१ लाख ११ हजार रूपयांचा कर भरणा केला आहे.

सुधारित देयके निर्गमित केल्यानंतरच्या अल्पावधीत केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन) श्री. सुनील धामणे तसेच करनिर्धारण व संकलन खात्यातील अधिकारी, कर्मचारी आणि विभाग कार्यालय स्तरावर कार्यरत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. तसेच उर्वरित कर संकलनासाठी पाठपुरावा सुरु ठेवण्याच्या सुचनाही केल्या आहेत.

### आर्थिक वर्ष (२०२३-२०२४)

**प्रशासकीय विभागनिहाय मालमत्ता कर संकलन**

१) ए विभाग - १५३ कोटी ०१ लाख रुपए
२) बी विभाग - २२ कोटी ३३ लाख रुपए
३) सी विभाग - ४१ कोटी ९३ लाख रुपए
४) डी विभाग - ११४ कोटी ४१ लाख रुपए
५) ई विभाग - ६९ कोटी ४६ लाख रुपए
६) एफ दक्षिण विभाग - ५७ कोटी ८५ लाख रुपए
७) एफ उत्तर विभाग - ६९ कोटी २३ लाख रुपए
८) जी दक्षिण विभाग - २५७ कोटी ११ लाख रुपए
९) जी उत्तर विभाग - १३१ कोटी ७२ लाख रुपए
१०) एच पूर्व विभाग - ३३६ कोटी ४५ लाख रुपए
११) एच पश्चिम विभाग - १८५ कोटी ५३ लाख रुपए
१२) के पूर्व विभाग - ३१७ कोटी ४८ लाख रुपए
१३) के पश्चिम विभाग - २३८ कोटी २८ लाख रुपए
१४) पी दक्षिण विभाग - १६७ कोटी २१ लाख रुपए
१५) पी उत्तर विभाग - ११५ कोटी ०३ लाख रुपए
१६) आर दक्षिण विभाग - ८५ कोटी ७४ लाख रुपए
१७) आर मध्य विभाग - १०५ कोटी ०७ लाख रुपए
१८) आर उत्तर विभाग - ३९ कोटी ३० लाख रुपए
१९) एल विभाग - १३९ कोटी ३४ लाख रुपए
२०) एम पूर्व विभाग - ५५ कोटी ०८ लाख रुपए
२१) एम पश्चिम विभाग - ७३ कोटी रुपए
२२) एन विभाग - १०३ कोटी ०८ लाख रुपए
२३) एस विभाग - २२६ कोटी २२ लाख रुपए
२४) टी विभाग - ८१ कोटी ७० लाख रुपए
२५) शासन मालमत्ता - १० कोटी ३५ लाख रुपए

**एकूण - ३ हजार १९५ कोटी ९१ लाख ११ हजार रुपए**

## सर्वत्र सुरु असलेल्या कामांमुळे ठाणे-बेलापूर मार्गावर वाहतूक कोंडी



■ नवी मुंबई : सध्या उन्हाचा तडाखा वाढला असून नवी मुंबईचे तापमान ४० अंशापर्यंत पोहोचले आहे. त्यातच सर्वात जास्त वाहतुकीची वर्दळ असलेल्या ठाणे- बेलापूर मार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. त्यामुळे ऐन उकाड्यात या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांसह प्रवाशांना करावा लागत आहे. ही सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी वाहनचालकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

या मार्गावरून बेलापूरहून ठाण्याकडे जाताना नेरूळ पार केल्यानंतर शिरवण्यात गावाकडे जाणाऱ्या आणि पुलावर चढणाऱ्या रस्त्याची पावसाळ्यापासून दुरवस्था झाली होती. त्यामुळे या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तिथून पुढे सानपाडाजवळ वाशीकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या डागडुजीचे काम सुरू आहे. त्यामुळे हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. मात्र, त्याच्याच बाजूला एक नवीन पूल तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुलावरून वाशीकडे जाता येते. मात्र, तुर्भे रेल्वे स्थानकाच्या समोरील रस्ता खोदून ठेवण्यात आलेला आहे.

येथे पूल उभारण्याच्या कामाला काही दिवसांपूर्वी सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे तुर्भे रेल्वे स्थानकासमोर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. ही वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाशी मार्केटकडे जाणाऱ्या वाहनांसाठी रेल्वे स्थानकाच्या आतील रस्त्याचा पर्यायही खुला करून देण्यात आलेला आहे. शिवाय वाहतूक पोलिसही भर उन्हात उभे असतात. मात्र, तरीदेखील येथील मार्गावरील वाहतूक कोंडी काही कमी होत नसल्याचे चित्र आहे.

कोपरखैरणे रेल्वे स्थानक पार केल्यावर पुढे असलेल्या सिग्नलवर चार रस्ते एकत्र येत असल्याने या मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागत आहे. येथील मार्गावरील महापे जंक्शनवरही मोठ्या प्रमाणात रस्त्याची कामे सुरू आहेत. त्यामुळे अर्धा मार्ग रस्त्याच्या कामामध्ये बंद आहे. महापे जंक्शनवरून अनेकांना शिळफाटा गाठायचे असते. मात्र, येथील वाहतूक कोंडीमुळे जंक्शनवर बराच वेळ वाया जात आहे. एकीकडे आग ओकणाऱ्या सूर्याच्या गमीर्मुळे अंगाची लाही लाही होत असताना ठाणे- बेलापूर मार्गावर वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांचा जीव नकोसा होत आहे.

## मुंबईत ४,७७३ फेरीवाल्यांवर कारवाई

# आता तरी फेरीवाले हटणार का?



■ मुंबई : रेल्वे स्थानकाबाहेरील अनधिकृत फेरीवाल्यांवर पालिकेच्या अतिक्रमण व निर्मूलन विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये खार, दादर, चेंबूर, मालाड, घाटकोपर सारख्या वर्दळीच्या स्थानकांचा समावेश आहे. ५ मार्चपासून हाती घेण्यात कारवाईमध्ये ५३ रेल्वे स्थानकाबाहेरील ४,७७३ फेरीवाल्यावर कारवाई करण्यात आली. असे असले तरी पुन्हा काही दिवसांनी हे फेरीवाले आपले बस्तान आणि व्यवसाय थाटून बसतात. त्यामुळे आता तरी फेरीवाले हटणार का? असा सवाल स्थानिक दुकानदार आणि प्रवासी करीत आहेत. पालिकेकडून रोज किमान चार रेल्वे स्थानकाबाहेरील फेरीवाल्यावर कारवाई करून तो परिसर फेरीवाला मुक्त करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. रेल्वे स्थानक परिसरात १५० मीटरपर्यंत फेरीवाल्यांना प्रतिबंध करण्यात आला आहे मात्र नियम धाब्यावर बसवून अनधिकृत फेरीवाले आपली दुकाने थाटून बसतात. मुंबईतील दादर, कुर्ला, वांद्रे, घाटकोपर, सीएसटी, आदी रेल्वेस्थानक परिसर अनधिकृत फेरीवाल्यांनी वेढला गेला आहे. त्यामुळे ऐन गर्दीच्या वेळी प्रवाशांना कसरत करून चालावे लागत आहे.

सीएसएमटी रेल्वे स्थानकातील भुयारात सुरक्षारक्षक ठेवूनही येथे अनधिकृत फेरीवाले वाट अडवून बसत असल्याचे दिसून येत आहे. भुयाराच्या बाहेरच्या मोकळ्या जागाही फेरीवाल्यांनी गजबजून जातात. येथे पालिकेचे मुख्यालय बाजूलाच आहे मात्र पालिकेचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे. रेल्वे स्थानक परिसरात १५० मीटर आणि शाळेपासून १०० मीटरच्या अंतरात फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मनाई करण्यात आली आहे मात्र या नियमांकडे दुर्लक्ष करून फेरीवाले रेल्वे परिसरातील पदपथ, स्कायवॉक, पादचारी पुलावर सर्रास व्यवसाय करीत आहेत. संपूर्ण स्वच्छता मोहिमेचा भाग म्हणून आधीच विविध विभागात अस्वच्छता पसरविणाऱ्यावर कारवाई होत आहे. या अनधिकृत फेरीवाल्यांची कारवाई ही परिसर मोकळा करण्यास मदत झाली आहे. मोकळ्या जागा अडविल्या जात असल्याने नागरिकांना कसरत करून चालावे लागत आहे. दादर असो किंवा मालाड रेल्वे स्थानकाच्या बाहेरील फेरीवाल्यांवर कारवाई पालिकेकडून तीव्र केली. कारवाईच्या कालावधीत येथील रस्ते काहीसे मोकळे झाल्याने अनेक प्रवाशांनी समाधान व्यक्त केले होते मात्र पुन्हा काही तसंही आणि दिवसाने हे फेरीवाले आपले बस्तान आणि व्यवसाय थाटून बसत असल्याच्या तक्रारी स्थानिक दुकानदार आणि प्रवासी करतात. कारवाईनंतर पालिकेने तेथे पुन्हा फेरीवाल्यांचे बस्तान मांडू नये यासाठी उपाययोजना कराव्यात, अशा मागणी स्थानिक करीत आहेत.

## आयसीयूमध्ये रुग्णाला उंदीर चावल्याने मृत्यू; नातेवाईकांचां गंभीर आरोप

■ पुणे : पुण्यातील ससून रुग्णालयातून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. रुग्णातील एका रुग्णाला उंदीर चावल्याने त्याचा मृत्यू झालाय, असा आरोप मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांनी केला आहे. तसेच मृतदेह ताब्यात घेण्यास देखील नातेवाईकांचा नकार दिला आहे.

मिळालेल्या अधिक माहितीनुसार, सदर रुग्ण ससून रुग्णालयातील आयसीयू विभागात काही दिवसांपूर्वी दाखल झाला होता. त्याचा आज मृत्यू झाला आहे. नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनावर यासाठी गंभीर आरोप केले असून रुग्णालयाने मात्र हा दावा फेटाळून लावलाय.



सागर रणुसे असे मृत्यू झालेल्या रुग्णाचे नाव आहे. १५ तारखेला दुचाकी चालवत असताना सागरचा अपघात झाला होता. १७ मार्च रोजी त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरूच होते. तसचं २५ तारखेला त्याच्यावर एक शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर सागरला आयसीयू विभागात दाखल करण्यात आलं. मात्र त्याची प्रकृती ढासळत गेली आणि मृत्यूशी सुरू असलेली त्याची झुंज संपली.

नातेवाईकांनी आयसीयूमध्ये सागरला उंदीर चावला आणि त्याचा मृत्यू झाला असा आरोप केला आहे. मात्र नातेवाईकांनी केलेल्या आरोपात काहीच तथ्य नसल्याचे ससून रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पोलीस या प्रकरणी अधिक तपास करतायत.

## केमिकल कंपनीत भीषण अग्नितांडव

### आग विझविण्यासाठी शथीर्चे प्रयत्न सुरू

■ नवी मुंबई : बदलापूरच्या एमआयडीसीत असलेल्या एका केमिकल कंपनीला दुपारी (२ एप्रिल) आग लागली. डि.के. फार्मा असं या केमिकल कंपनीचं नाव आहे. आग लागल्याचं समजताच घटनास्थळी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आलं. जवळच असलेल्या बदलापूर अग्निशमन दलाच्या फायर सेंटरमधून दोन गाड्या घटनास्थळी आग विझवण्यास पोहचल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळविण्याचं काम सुरू आहे. बदलापूर अग्निशमन दल आणि अंबरनाथ अग्निशमन दल शथीर्ने आग विझविण्याचा प्रयत्न करत आहे. आगीचं नेमकं कारण अजून अस्पष्ट आहे. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. नवी मुंबईतील खेळणे एमआयडीसी परिसरात नवभारत इंडस्ट्रियल केमिकल कंपनीला भीषण आग लागली होती. आगीची भीषणता जास्त होती. त्यामुळे शेजारी असणाऱ्या दोन कंपन्यांना देखील आगीने आपल्या भक्षस्थानी घेतलं होतं. नवभारत केमिकल, क्लीनकेम लॅब आणि जास्मिन आर्ट अँड प्रिंट या तीन कंपन्यांना ही आग लागली होती.

अग्निशमन दलाच्या १२ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. आग विझविण्यासाठी वेगात प्रयत्न सुरु होते. केमिकलवर फोमचा मारा करण्यात येत होता, तर इतर दोन कंपन्यांवर पाणी मारून आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या आगीमध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु कंपनीचं मोठं आर्थिक नुकसान झालं आहे. एमआयडीसीची अग्निशमन यंत्रणा वेळेत पोहोचत नसल्यामुळे आगीची भीषणता वाढली, असा आरोप एका कर्मचाऱ्याने केला आहे. घटनास्थळी आग विझविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होते.

## पिंपरीतील ३०० मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित, पाणीपट्टी थकविल्याने महापालिकेची कारवाई




■ पिंपरी : गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपट्टी न भरणाऱ्या ३०० पेक्षा जास्त मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत. पहिल्यांदाच करवसुली व करसंकलन विभागाच्या माध्यमातून पाणीपट्टी वसूल करण्यात आली. सरत्या आर्थिक वर्षात ७८ कोटी ५७ लाखांची पाणीपट्टी वसूल झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा एक लाख ७६ हजार अधिकृत नळजोडधारक आहेत. महापालिकेला पाणीपुरवठा विभागाकडून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. थकबाकीही वाढत होती. एकीकडे मालमत्ता करातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत होता. राज्यातील काही पालिकांमध्ये पाणीपट्टी वसुली आणि करवसुलीचे एकत्रित कामकाज चालते. त्या महापालिकांचा पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाने अभ्यास केला. त्यानुसार २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून पहिल्यांदाच करसंकलन आणि पाणीपट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय यांनी प्रशासनाने घेतला. त्यानुसार करसंकलन विभागाने पाणीपट्टी वसुलीची कारवाई सुरू केली.

गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपट्टी न भरणाऱ्या ३०० पेक्षा जास्त मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित करण्याची कारवाई केली. मीटर निरीक्षकांना करसंकलन वसुली पथकाची साथ मिळाली. या कारवाईमुळे ६० कोटींच्या पुढे कधीही वसूल न होणारी पाणीपट्टी आता ८० कोटींच्या घरात गेली आहे. दरम्यान, २०१९-२० मध्ये ४२ कोटी ९४ लाख, २०२०-२१ मध्ये ४१ कोटी ८६ लाख, २०२१-२२ मध्ये ५४ कोटी ९७ लाख, २०२२-२३ मध्ये ५७ कोटी ६७ लाख आणि २०२३-२४ मध्ये ७८ कोटी ५७ लाख रुपयांची वसुली झाली आहे. थकीत पाणीपट्टी असलेल्या मालमत्ताधारकांचे नळजोड खंडित करण्याची कारवाई यापुढेही चालू राहणार आहे. अवैध नळजोडाबद्दल धोरण आखून कार्यवाही करण्यात येईल, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी सांगितले.

## गांजा विक्री प्रकरणात दोन जणांना अटक

### १ लाखाचा मुद्देमाल जप्त



■ मिरा भाईंदर : काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून चार किलो वजनाचा गांजा व इतर साहित्य असे जवळपास १ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. गांजा विक्री करण्यास बंदी असताना बाहेरून येत गांजा विक्री करण्याचा प्रयत्न दोघांकडून केला जात होता. याबाबत पोलिसांना माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत दोघांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेले दोन्ही आरोपी सुरत येथील असून बॅगेत गांजा विक्रीसाठी घेऊन ते मिरारोड येथे आले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. त्यांच्यावर काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याशिवाय त्यांच्यावर अजून गुन्हे दाखल आहेत का? याबाबत पोलीस तपास करण्यासाठी पथक पाठवण्यात आले आहेत. तसेच कोणालाही अश्या प्रकारचे चुकीचे काम होत असल्याचे दिसल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा व त्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल असे आव्हान पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी केले आहे.

## एमएमआरडीए कांजूरमार्गमधील जागेच्या प्रतीक्षेतच कारशेडसाठी अतिरिक्त जागेची राज्य सरकारकडे मागणी

■ मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) अद्यापही 'स्वामी समर्थ नगर - विक्रोळी पूर्व द्रुतगती महामार्ग मेट्रो ६' मार्गिकेच्या कारशेडसाठी सात हेक्टर जागेची प्रतीक्षा आहे. कांजूरमार्ग कारशेडसाठी उपलब्ध असलेली जागा अपुरी पडत असल्याने अतिरिक्त सात हेक्टर जागेची मागणी एमएमआरडीएने केली आहे. येत्या काही दिवसात कारशेडच्या कामास सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे




नियोजन आहे. त्यामुळे ही जागा लवकरात लवकर ताब्यात येणे एमएमआरडीएसाठी आवश्यक आहे. मेट्रो ६ मार्गिकेची कारशेड कांजूरमार्ग येथे प्रस्तावित आहे. मात्र ही जागा वादात अडकल्याने मेट्रो ६ चे काम सुरू होऊनही अनेक दिवस झाल्यानंतरही कारशेडची जागा ताब्यात आली नव्हती. पण अखेर जागेचा वाद मिटला आणि काही महिन्यांपूर्वी कांजूरमार्ग येथील १५ हेक्टर जागा एमएमआरडीएच्या ताब्यात आली. ही जागा ताब्यात येताच एमएमआरडीएने कांजूरमार्ग कारशेडच्या कामासाठी ऑक्टोबर २०२३ मध्ये निविदा प्रसिद्ध केली. आता मार्चमध्ये निविदा अंतिम करण्यात आली असून आता लवकरच कारशेडच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. मात्र त्याचवेळी सात हेक्टर जागेची एमएमआरडीएला प्रतीक्षा आहे.

### एमआयडीसी नाल्यातील पाण्याला निळा रंग

## केमिकल मिश्रित पाण्याला उग्र दर्प, स्थानिक हैराण



■ डोंबिवली : डोंबिवली औद्योगिक विभाग फेज २ मधील नाल्यात रासायनिक कंपन्यांतून केमिकल मिश्रीत पाणी सोडले जात आहे. या रासायनिक पाण्यामुळे येथील नाल्याला निळा रंग आला असून त्या पाण्याच्या उग्र दर्पाने परिसरातील रहिवासी हैराण झाले आहेत. रासायनिक कंपन्यांतून अनेकदा प्रक्रीया न करताच सांडपाणी नाल्यात सोडले जात असून यावर प्रशासनाचा अंकुश नसल्याने रहिवाशांना देखील कोणी वाली राहीला नसल्याचे नागरिक म्हणत आहेत.

यापूर्वी देखील रासायनिक सांडपाण्यामुळे नाल्यातील पाण्याला हिरवा, निळा, लाल रंग आल्याचे पहायला मिळाले आहे. यावर कायमस्वरुपी तोडगा कधी निघणार असा सवाल नागरिक करत आहेत. गेल्या एक दोन दिवसांपासून निळ्या रंगाचे रसायन मिश्रित पाणी सोडले जात आहे. सकाळ किंवा रात्रीच्या वेळेस हे पाणी कारखान्यांतून नाल्यात सोडले जात असून या पाण्याच्या उग्र दर्पाने स्थानिक रहिवासी हैराण झाले आहेत. राज्य शासनाने १५६ रासायनिक कारखाने स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला असला तरी अद्याप त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसल्याने प्रशासन नागरीकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप रहिवासी करतात.

डोंबिवली एमआयडीसीतील रासायनिक कंपन्यांतून सोडल्या जाणाऱ्या वायूमुळे, तसेच रसायन मिश्रित पाण्यामुळे निवासी भागातील रहिवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. स्थानिकांचा हा त्रास कमी करण्यासाठी राज्य शासनाने औद्योगिक विभागातील १५६ रासायनिक कारखाने पाताळगंगा येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्याप्रकरणी कारवाई शून्य असल्याने स्थानिकांना आजही या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

या प्रदुषणामुळे शहरातील अंतर्गत नाल्यांना हिरवा, निळा, पांढरा, नारंगी असे अनेक रंग प्राप्त होऊन त्यांच्या उग्र दर्पामुळे डोळे चुरचुरणे, मळमळ, उलट्या यांसारखे त्रास कायम सतावत आहेत. खुद्द तात्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या परिसराची पाहणी करुन येथील समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर राज्य शासनाने कारखाने स्थलांतराचा निर्णय घेतला होता. मात्र यावर अंमलबजावणी का केली जात नाही. रासायनिक कारखाने स्थलांतरीत करण्याचे निर्णय घेऊन केवळ नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले जात आहे, प्रत्यक्ष कारवाई न करता राज्य शासन कारखानदारांना सूट दिली जात असल्याचा आरोप देखील स्थानिक नागरिक करत आहेत.

नाल्यातील पाण्याचा रंग बदलला असल्याची बाब उघड उघड येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाच्या लक्षात येते. मात्र याकडे प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष जाऊ नये ही बाब आश्चर्यकारक आहे. या पाण्याला उग्र दर्प येत असून यामुळे स्थानिक नागरिक हैराण झाले आहेत. रात्रीच्या वेळेस हा वास वाढत असल्याची तक्रार नागरिक करतात. निवासी विभागाच्या लगत असलेल्या नाल्यात मिळ्या रंगाचे केमिकल युक्त पाणी कंपनीकडून सोडण्यात आले आहे. यामुळे दुर्गंधीचा सामना येथील रहिवासी करत आहेत.

या दुर्गंधीने श्वास घेणे सुद्धा नकोसे वाटत आहे. या अगोदर ही लाल, हिरवे केमिकल युक्त पाणी सोडण्यात आले होते. स्थानिक लोकांच्या जीवाशी खेळवण्याचा प्रकार सर्रास कंपन्या करत आहेत. यावर कहर म्हणजे प्रदुषण नियंत्रण मंडळ डोळ्यावर झापड लावून बसले आहे. या संदर्भात एमआयडीसीला रहिवाशांना कोणीच वाली नाही आहे का? या पुढे असेच केमिकल युक्त पाणी नाल्यात दिसल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसेचे विभाग अध्यक्ष संजय चव्हाण यांनी दिला आहे.

## चार गावठी पिस्तूले व ५९ जिवंत काडतुसे जप्त

### पोलिसांची मोठी कारवाई



■ मुंबई : गावठी पिस्तूल व जिवंत काडतूसांच्या माध्यमातून व्यवसायात प्रतिस्पर्धी असलेल्यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न पोलीसांनी हाणून पाडला आहे. पोलीसांनी याप्रकरणी ४ गावठी पिस्तूले व ५९ जिवंत काडतुसे हस्तगत करुन दोन आरोपींना अटक केली आहे. काशी मिरा पोलीस ठाणे व गुन्हे शाखा यांनी संयुक्तपणे ही कामगिरी पार पाडली. गोल्डन नेस्ट सर्कल जवळ असणाया अलम स्टील अँड फर्नीचर येथे काम करणाया इसमांकडे विनापरवाना पिस्तूल व जिवंत काडतूसे असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. त्याप्रमाणे चौकशी केल्यानंतर फिरोज आलम शफीऊल्ला चौधरी याच्या ताब्यात १ गावठी पिस्टल व १० जिवंत काडतुस तर शाकीर अब्दुल वहाब चौधरी याच्या ताब्यात १ गावठी पिस्टल व ६ जिवंत काडतूसे आढळून आली. त्यानंतर आरोपींकडे अधिक चौकशी केली असता फिरोज ऊर्फ इब्राहीम आलम शफीऊल्ला चौधरी याला अमान स्टिल किचन इक्वीपमेंटचे मालक अनिस ऊर्फ मुन्ना खान व कमिल खान त्याचप्रमाणे शादाब स्टीलचा मालक शादाब यांच्या मुळे व्यवसायामध्ये भरपुर नुकसान झाले होते. त्यांना धडा शिकविण्यासाठी चौधरी याने त्याच्याकडे पूर्वी काम करणारा मुस्लीम याच्याकरवी ६ गावठी पिस्तूले व जिवंत काडतूसे मागवली.

त्यापैकी दोन गावठी पिस्तुले व जिवंत काडतूसे त्याने तीन दिवसांपूर्वी अनिस ऊर्फ मुन्ना खान यांच्या नकळत त्यांच्या दुकानात ठेवली तर दोन पिस्तुले व १२ काडतूसे त्याने एका बॅगेमध्ये ठेवून ते वसोर्वा पुलावरुन खाडीत फेकुन दिले. तसेच त्याच्याकडे सापडलेले पिस्तुल व काडतूसे तो एक दोन दिवसात कमिल खान यांच्या दुकानात ठेवणार होता. त्याचप्रमाणे दूसरा आरोपी शाकीर अब्दुल वहाब चौधरी याच्या ताब्यात मिळून आलेले पिस्तुल व काडतूसे तो एक दोन दिवसात शादाब यांच्या दुकानात ठेवणार होता अशी कबुली आरोपींनी दिली, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबूरे, परिमंडळ - १ चे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलिस निरी अविराज कुराडे, काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळे, यांच्या पथकाने पार पाडली.